
चक्रमादित्याचा
दर्बार
3
डॉ. नितीन मोरे
COU NCIL
BILL

# चक्रमादित्याचा दर्बार ३

(विनोदी नाटक)

डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# चक्रमादित्याचा दर्बार ३

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# चक्रमादित्याचा दर्बार ३

लेखक: डॉ. नितीन मोरे

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २६ जुलै २०२०

©esahity Pratishthan®2020

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत.

त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली.

सामान्यत: आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे पंचविसावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo. com

# चक्रमादित्याचा दर्बार - ३

**प्रस्तावना**

मोबाईल ने विश्व व्यापले आहे सारे..

खरेखुरे आणि मानसिक देखील.

आपले महाराज आणि त्यांचे राज्य कसे अपवाद असतील?

महाराजांनी कात टाकूनही एक जमाना लोटला. स्मार्ट फोन बरोबरच महाराजही स्मार्ट झालेत.

आणि त्याच स्मार्टपणे विरोधाचा बीमोड करतील महाराज आता.

राज्य करणे म्हणजे महाराजांसाठी निर्विघ्नपणे पार पाडण्याची गोष्ट.. त्यात अडथळे आणणारे त्यांचे शत्रूच..

मग भले ते त्यांच्याच राज्यातले नागरिक असोत! स्मार्ट महाराजांनी केलाय आता आपल्या विरोधाचा बंदोबस्त आणि आपला मार्ग प्रशस्त!

नव्या चक्रमादित्याचा नवा दरबार हा!

नेहमीप्रमाणे सारी पात्रे नि कथानक पूर्णपणे काल्पनिक, एक मोबाईल सोडला तर!

बाकी योगायोगाच्या 'गोष्टी' सापडल्या तर तो पूर्णपणे योगायोगच समजावा.

डॉ. नितीन मोरे

## ***नांदी***

एक

*पद्य नांदी*

नमन नटवरा विस्मयकारा
तूच देशीचा तारणहारा..

लोकप्रियतेची उसळे लाट
तूच पुढे अन् बाकी सपाट
वाजवीशी इतरांचे बारा
नमन नटवरा..

दुष्ट संहारशी लावशी वाट
तुझ्या मुळे ही दिसे पहाट
आकाशी तू अढळ तारा
नमन नटवरा..

आशाळभूत सतराशेसाठ
हाती उभे घेऊनिया ताट
मिळे तव कृपे प्रसाद सारा
नमन नटवरा..

काय वदावा आपुला थाट
गायीगुरांसम आम्ही भाट
थोडा आम्हांही घाली चारा
नमन नटवरा..

स्तुती न करती ते ते माठ
आडवा मांडावा त्यांचा ताट
तूच तयांचा विनाशकारा
नमन नटवरा..

तव प्रेमींना देशी बक्षीस
विरोध करती त्यांना तोशिस
दावी त्यांना भर दिवसा तारा
नमन नटवरा विस्मयकारा

कुणी न तुजसम म्हणती भाट
घालित पूजारतीचा घाट
भक्तीमय हा परिसर सारा
नमन नटवरा..

दोन

***गद्य नांदी***

प्रधानजी आणि महाराज उभे आहेत..

महाराज : परधानजी

प्रधानजी : होय महाराज

महाराज : परजा समदी सुकी?

प्रधानजी :  होय महाराज

महाराज : नक्की सुकी?

प्रधानजी : नाय महाराज..

महाराज : काय सुकी न्हाई परजा?

प्रधानजी : नाही महाराज..

महाराज : खामोश.. आमची आद्न्या..

प्रधानजी: होय महाराज

महाराज : सुकी आहे परजा..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : मग न्हाई म्हणाले तुम्ही?

प्रधानजी : सुकी नाही प्रजा..

महाराज : आमची आद्न्या मोडून?

प्रधानजी : नाही महाराज..

महाराज : मंग सुकी कशी न्हाई?

प्रधानजी: सुकी नाही.. सुखी आहे महाराज.

महाराज : त्येच्या म्हनत व्हतो आमी..

प्रधानजी : होय महाराज..

महाराज : सुकी म्हनजे सुकीच

प्रधानजी : होय महाराज

महाराज : फुडं काय आजून?

प्रधानजी : नाही महाराज..

महाराज : मग दरबार बरखास्त करावा?

प्रधानजी : नाही महाराज..

महाराज : म्हंजे कामकाज बाकी हाये?

प्रधानजी : होय महाराज..

१

चक्रमादित्य महाराज दरबारात प्रवेश करत आहेत.

सर्व दरबारी :

नमन नटवरा विस्मयकारा

तूच डिजिटल तारणहारा..

हुशार स्मार्ट महाराज आमुचे

आणती दिन हे नव्या युगाचे

नव्या युगाचा वाहवी वारा

नमन नटवरा विस्मयकारा..

चक्रमादित्य महाराजांचा विजय असो..

*महाराज सिंहासनावर बसतात. महाराज आता स्मार्ट आणि टिपटॉप सुटाबुटात आहेत. हातात फुलाऐवजी मोबाईल आहे. महाराज मोबाईलकडे पाहात हसतात..*

महाराज : वा! गुड मॉर्निंग! काय फूल!

*मोबाईल नाकाजवळ नेऊन वास घेतात फुलाचा. दीर्घ श्वास घेत. वास न आल्याने चमकून बाजूला ठेवतात मोबाईल.*

महाराज : प्रधांजी, आमच्या डिजिटल कारभाराचा पहिलाच दिवस. गुलाबाचे फूल हातात नाही पण सवयीने आम्ही वास घेतलाच. खरे फूल नाही पण या डिजिटल फुलाच्या वासाने दिवस चांगला जाईल.

प्रधानजी : आज्ञा महाराज. दिवस चांगला जाईल अशी आज्ञा असेल तर दिवस चांगलाच जाणार महाराज!

महाराज : वा! प्रधांजी, आम्ही आमच्यावर खूपच खूश आहोत!

प्रधानजी : अर्थात महाराज. तुम्ही आहात तर हे राज्य आहे, तुम्ही आहात तर हा देश आहे, तुम्ही आहात तर हे जग आहे.. तुम्ही आहात म्हणून हे विश्व आहे.. तुम्ही आहात म्हणून ही आकाशगंगा आहे..

महाराज : आणि हा दरबार?

प्रधानजी : तो पण तुम्ही आहात म्हणूनच आहे महाराज!

महाराज : चला, कारभारास सुरूवात करा.

प्रधानजी : आपण राज्यकारभार बघावा महाराज, आपली हरकत नसल्यास बाकी कारभार आम्ही पाहून घेऊ.

महाराज : छान. बोला राज्याची हालहवाल कशी आहे?

प्रधानजी : अर्थातच चांगली. आपली आज्ञाच आहे तशी. महाराजांना आम्ही सकाळीच व्हॉट्स्यापी संदेश पाठवला आहे. आणि महाराजांनी तो वाचला देखील आहे!

महाराज : कधी?

प्रधानजी : आमच्या ह्या मोबायलात तुम्ही तो वाचल्याची निळी खूण आहे महाराज, ठीक सात वाजून सदोतीस मिनिटांनी.

महाराज : असेल, पण आम्ही तेव्हा स्नानगृहात होतो. त्याच्याशिवाय राहवत नाही म्हणून मोबाईल आम्ही स्नानगृहात नेतो, जल प्रतिबंधक आवरणात. तुमचा संदेश पाहिला तेव्हा आम्ही मुखास साबण लावला होता. डोळे किलकिले करून पाहिला तो. आणि डोळ्यात तो साबण गेला..

प्रधानजी : काय? त्या यःकश्चित साबणाची ही हिंमत? आज्ञा असेल तर हत्तीच्या पायी देऊ त्यास.

महाराज : त्वरित. साबणास शिक्षा झालीच पाहिजे.

प्रधानजी : शिपाई, महाराजांच्या स्नानगृहातील त्या साबणास आताच्या आता यःकश्चित हत्तीच्या.. नव्हे यःकश्चित साबणास हत्तीच्या.. पायदळी.. नव्हे पायी द्यावे. महाराजांच्या हुकुमाची त्वरित अंमलबजावणी व्हावी.

*शिपाई निघून जातो. दरबारात महाराज आणि प्रधानजी यांशिवाय कुणालाच बोलण्याची परवानगी नाही. त्यामुळे शिपाई गुपचुप निघून जातो.*

महाराज : तर तो संदेश, पाहिला आम्ही, पण वाचू शकलो नाही आम्ही. डिजिटल राज्यात आम्ही सदैवच संपर्कात असणे गरजेचे. असो. यापुढे पोहण्याचा चष्मा घालून आम्ही स्नानास जाऊ. पण सदैव संपर्कात राहू. आम्ही तो संदेश आता वाचून घेतो.

*महाराज संदेश वाचतात. वाचताना हसतात. हसत हसत मोबाईल बाजूला ठेवतात.*

प्रधानजी : काय झाले महाराज? आपण हसत आहात? आमचे काही चुकले का? पहिलाच दिवस. माफी असावी.

महाराज : आम्ही तुम्हाला नाही हसत.. त्या दुसऱ्या फॉरवर्डास हसतो आहोत. विनोदी, अति विनोदी. सुंदर. हसून हसून आम्ही जमिनीवर लोळण घेऊ की काय असे वाटतेय! आम्ही ही डिजिटल राज्याची कल्पना राबवून..

प्रधानजी : जनतेची हसण्याची सोय केलीत महाराज. आम्ही सारे या बद्दल ऋणी राहू महाराजांचे. कितीही परिस्थिती वाईट असली तरी चेहऱ्यावरचे हास्य जाऊ देऊ नये.. आजचाच संदेश होता घाम फुटलेल्या एका पांढऱ्या गुलाबाच्या फुलाखाली..

महाराज : गुलाबास घाम फुटला?

प्रधानजी : होय महाराज, दव बिंदू असावेत, पण फोटोत घर्मबिंदू वाटत होते.. तर संदेश असा होता.. परिस्थिती बदलो न बदलो, फुलासारखे हास्य कायम रहावे हीच शिकवण असावी आम्हाला. असले तत्वज्ञान शिकवणे तर संत महंतांसही नाही जमले कधी.

महाराज : म्हणूनच आम्ही आमचे राज्य तंत्रज्ञानाधिष्ठित बनवण्याचा आदेश दिला आहे आम्ही.

प्रधानजी : आपण थोर आहात महाराज. आमचे भाग्य थोर म्हणून आपल्यासारखे थोर महाराज आम्हाला मिळाले. नाहीतर आमच्या देशाची अवस्था वाईट झाली असती.

महाराज : धन्यवाद प्रधांजी..

प्रधानजी : आपली आज्ञा असेल तर राज्यकारभार सुरू करावा महाराज?

महाराज : आम्ही खफा आहोत. आतापर्यंत आपण जे केले तो राज्यकारभार नव्हता?

प्रधानजी : क्षमा असावी महाराज. अभय असावे. नाहीतर उद्या मोबाईलवर आमची निंदा यावयाची आणि ट्रोल करेल कुणी आम्हास.

महाराज : हीच आमच्या डिजिटल राज्याची ताकद आहे. आम्ही लहानात लहान व्यक्तीस व्यक्त होण्याची संधी मिळवून दिलीय. जुन्या जमान्यात उचलली जीभ लावली टाळूला म्हणायचे.. तसे कुणीही उचलले बोट आणि लावले मोबाईलास असे करू शकतो. लहानातल्या लहानास व्यक्तिस्वातंत्र्य देऊ केले आम्ही. आम्ही दुष्ट आहोत..

प्रधानजी : माफी महाराज, द्रष्टा म्हणायचे आहे का महाराजांस?

महाराज : अर्थात, आम्ही तेच म्हणालो, आम्ही दुष्ट आहोत अगदी. पुढच्या जमान्याच्या हाका आम्हाला ऐकू येतात..

*बाहेरून गलका ऐकू येतो. कुणीतरी कुणाला तरी हाका मारतोय. शिपाई धावत धावत येऊन प्रधानजींच्या कानात काही सांगतो..*

महाराज : प्रधांजी, हा विंगेत गलबला का होतो आहे?

प्रधानजी : महाराज, आपला लाडका राजरत्न.. गजराज..

महाराज : काय झाले गजराजास?

प्रधानजी : साबणास पायदळी तुडवता तुडवता त्यावरून घसरून पडले गजराज.. त्यांचा मांडीचे हाड मोडले आहे..

महाराज : ही बातमी कोणी आणली? शिपाई? हा की तो? की दोन्ही? दोघांना त्याच राजरत्न गजराजांच्या पायी द्यावे..

प्रधानजी : जो हुकूम महाराज..

महाराज : त्वरित..

प्रधानजी : एक मामुली अडचण महाराज..

महाराज : आमच्या राज्यात अडचण?

प्रधानजी : राजरत्न मांडीचे हाड तुटल्यामुळे उभे राहू शकणार नाहीत.. तेव्हा.. पायतळी तुडवण्यास..

महाराज : खामोष! शिपायांस वाट पाहावीच लागेल. हत्तीच्या पायी जाण्याची घाई, तेही राजगजराजांच्या पायी जाण्याची घाई करून चालणार नाही. जा शिपायांस बंदिगृहात ठेवा. आणि राजवैद्यांस बोलावणे धाडा.

प्रधानजी : पाठवले महाराज

महाराज : कधी?

प्रधानजी : हे आत्ता. व्हॉट्स्यापी संदेश धाडलाय. त्यांची निळी खूण आलीय. ताबडतोबीने निघालेत राजवैद्य.

महाराज : पाहिलेत डिजिटल मोबाईल क्रांती?

प्रधानजी : होय महाराज, आपण ग्रेट आहात महाराज आणि ऑसम ही!

महाराज : प्रधांजी, हे कुठले शब्द?

प्रधानजी : महाराज, ही खास व्हॉट्स्यापी लिंगो आहे. येथे सारे ग्रेट आणि ऑसम असते.

महाराज : लुंगी?

प्रधानजी : लुंगी नव्हे, लिंगो महाराज, लिंगो म्हणजे भाषा..

महाराज : आणि ऑसम? म्हणजे लयभारी की काय?

प्रधानजी : अर्थात महाराज.  यापुढे आम्ही ल.भा. असा संदेश पाठवू ग्रेट ऐवजी!

महाराज : हे ऑसम होईल प्रधांजी..

प्रधानजी : ल.भा. महाराज!

*महाराजांचा फोन वाजतो. महाराज पाठमोरे होत हात तोंडावर ठेऊन बोलतात. प्रधानजी आणि समस्त दरबारी आपापल्या मोबाईल मध्ये दंग होतात. काही वेळात महाराज वळून हसत हसत सिंहासनावर बसतात.*

*बाहेर आवाज येतो. चार धडधाकट इसम मोठाले कारपेट घेऊन आत येतात. हातात ते चिटकवण्यासाठी फेव्हिकॉलचे मोठाले डबे.*

महाराज: प्रधांजी, हे कोण आहेत?

प्रधानजी : हे कारपेट महाराज, गालिचा म्हणा.

महाराज : हा इथे कोठून आला?

प्रधानजी : आम्ही मागवला, आताच.

महाराज : आता? तुम्ही तर येथून हलला नाहीत प्रधांजी

प्रधानजी : ऑनलाईन महाराज. डिजिटल पेमेंट. सरकारी तिजोरीतून कारपेटवाल्याच्या तिजोरीत डायरेक्ट ट्रान्सफर! सारे काही चुटकीसरशी. महाराजांची कृपा आहे!

महाराज : ते छान. इतक्या जलद तर शिंक ही येत नाही आम्हास. पण हे कारपेट कशाकरता?

प्रधानजी : खास आपल्याकरिता महाराज.

महाराज : आमच्याकरिता?

प्रधानजी : होय महाराज, आपल्या डिजिटल राज्यात आपल्याला संदेश येणार.. त्यात विनोदी फॉरवर्ड्स असणार..

महाराज : त्याचा गालिच्याशी संबंध?

प्रधानजी : आहे महाराज आहे. आपण दिवसाच्या सुरूवातीस जे म्हणालात ते आमच्या या कर्णेंद्रियांनी टिपले. आणि आम्ही त्वरित त्यावर ॲक्शन घेतली महाराज.

महाराज : प्रधांजी, नीट सांगावे

प्रधानजी : आज्ञा महाराज, आता डिजिटल राज्यात आपल्या मोबायलात रोज विनोदामागून विनोद येतील..

महाराज : येतील

प्रधानजी : तुम्ही ते रोज वाचाल..

महाराज : वाचू..

प्रधानजी : ते वाचून हसाल..

महाराज : हसू..

प्रधानजी : आणि तुम्हाला ते इतके आवडतील..

महाराज : आवडू.. नव्हे आवडतील

प्रधानजी: असे विनोद की वाचून वाटेल जमिनीवर गडबडा लोळावे.. आज वाटले तसे..

महाराज : वाटेल..

प्रधानजी : महाराज, आपण जमिनीवर कसे लोळाल? म्हणून हा खास गालिचा आम्ही अंथरून घेत आहोत.. ऑनलाईन थेट दहा टक्के कमी रेट! आता कधीही हसता हसता जमिनीवर लोळावेसे वाटले तर लोळण्याची उत्तम सोय होईल आपली..

महाराज : वा! अत्युत्तम! आम्ही खूप खूश आहोत. आम्हास पटले ते, चोच देतो तो चारा ही देतो.. तसेच आहे हे.. विनोद पाठवेल तो लोळण्याची सोयही करेल तर! आम्ही खूप खूष आहोत आज! एक तो राजरत्नचा पाय तुटला ते सोडून..

प्रधानजी : काळजी नसावी महाराज, आम्ही आताच आमच्या मोबाईल मधून माहिती काढली आहे, हत्तीच्या मांडीच्या फ्रॅक्चरबद्दल. आठ रिस्पान्सेस आलेत.. ते वैद्यांना तत्परतेने पाठवले आहेत. आता पर्यंत राजवैद्यांनी ते वाचून उपाय सुरूही केले असतील!

महाराज : खरेय प्रधांजी, आमच्या ह्या टीचभर मोबाईलने जग आमच्या या मुठीत आणून सोडले आहे. आम्हाला आमचाच अभिमान वाटतो आहे. आता आम्ही हा दरबार बरखास्त करीत आहोत. आम्हाला एकशे बारा संदेश वाचायचे आहेत अजून. त्यांच्याशी पत्रव्यवहार, नव्हे, संदेश व्यवहार करावयाचा बाकी आहे. आम्ही आज खूप व्यस्त आहोत. तेव्हा बाकी कारभाराचे सांभाळून घ्या..

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आणि आपल्याला काही मदत लागल्यास मावशीस हाक मारावी महाराजांनी.

महाराज : आमची मावशी? तिला आमच्याहून जास्त ठाऊक आहे?

प्रधानजी : क्षमा महाराज, आपली सर्वांचीच मावशी, गुगल मावशी. तिला ठाऊक नाही असे जगात काय आहे?

महाराज : गुगल? ही कोणती नवी मावशी? आणि आमच्या मातोश्रींनी कधी सांगितले नाही ते?

प्रधानजी : क्षमा महाराज, महाराज ही मावशी डिजिटल आहे.. तिला सारे ठाऊक असते..

महाराज : ठीक, बोलावून घ्यावे तिला राजदरबारात.

प्रधानजी : नाही महाराज, ही मावशी आपल्या आपल्या मोबायलातच राहते.. तिला हाक मारली की क्षणार्धात हजर!

महाराज : वा! प्रधांजी वा! माय मरो पण मावशी जगो म्हणतात ते उगीच नाही! आम्ही आता निघतो. कार्यबाहुल्यामुळे दरबार बरखास्त. मावशीस भेटण्यास आम्ही आतुर आहोत. मावशी आम्ही येतोय.. गुगल मावशी.. हमारी मावशी.. दरबार बरखास्त करू दे आम्हास मावशी.. प्रधांजी..

प्रधानजी : आज्ञा महाराज.. आपली दरख्वास्त आणि दरबार बरखास्त!

सारे दरबारी : राजाधिराज चक्रमादित्य महाराजांचा विजय असो!

२

महाराज दरबारात प्रवेश करत आहेत..

सर्व दरबारी :

नमन नटवरा विस्मयकारा

तूच देशीचा तारणहारा

संहारिशी तू दुष्ट जनांना

घेऊन हाती एक बनाना

विरोधकांचा दमनकारा

नमन नटवरा तारणहारा

*महाराज मोबाईल हाती घेऊन येतात. लक्ष मोबाईल मध्ये. त्यामुळे गालिच्यावर पाय अडकून अडथळतात. पडता पडता सावरतात, पण मोबाईल शिताफीने हातातच आहे. लक्ष पण मोबाईलवरच. पडल्याबद्दल काही नाही पण मोबाईल बचावल्याचा आनंद आहे*

*चेहऱ्यावर. मग क्षणात सावरून महाराज सिंहासनावर बसतात. मोबाईलवरील निळ्या गुलाबाचे फूल दरबारी लोकांना दाखवत..*

महाराज :गुड मॉर्निंग..

प्रधानजी : शुभप्रभात महाराज. आपण पडल्यावर काहीतरी मोडल्याचा कट्कन आवाज आला. मोबाईल ठीक आहे ना?

महाराज (जोरदार जांभया देत) : सुप्रभात. हो हो. मोबाईल ठीक आहे. बहुधा हाताचे हाड बिड मोडले असेल.

प्रधानजी : ओके. मग काही विशेष नाही. महाराज निद्रा नीट झाली नाही का?

महाराज : होय प्रधांजी, ह्या व्हॉट्स्यापी संदेशांस उत्तरे देता देता निद्रानाश झाला. पण मजा आली. हे यंत्र आवडले आम्हास. सारे काही क्षणार्धात. वेळेचा अपव्यय अजिबात नाही. आणि त्यावर संदेश धाडता धाडता अर्धी रात्र कशी सरली तेच कळले नाही. असू देत. आमच्या कामापुढे झोपेचे ते काय? आधी राज्यकारभार मग झोप.. बोला. नवलविशेष प्रधांजी?

प्रधानजी : महाराज, मावशीची भेट झाली का?

महाराज : अर्थात, प्रधांजी निम्मी रात्र गुगल मावशी बरोबरच गेली. राणीसाहेब पण कावल्या. मग आम्ही ठरवले..

प्रधानजी : काय महाराज?

महाराज : हेच, असलेच एक यंत्र राणीसरकारास देऊ आम्ही. आमची मावशी ती त्यांचीही मावशी! त्यांचा वाढदिवस जवळच आहे त्यास भेट. एकदा त्यांच्या हाती आले हे यंत्र नि त्याचे तंत्र, की त्यांना वेळच मिळणार नाही आमच्यावर कावण्यास.. हो की नाही?

प्रधानजी : खरंय महाराज. काट्याने काटा काढावा तसा मोबाईल ने मोबाईल जोडावा! शुभ प्रभात!

महाराज : वा! प्रधांजी वा! आम्हाला वाटते की आमचे गुरूकुल सुटल्यानंतर इतक्या वर्षांनी हे आणि असले सुविचार ऐकत आहोत आम्ही. आता सुविचारी जनतेची फौजच फौज उभी राहिल देशभरात. प्रत्येकाने रोजी एक सुविचार नि सुभाषित वाचले की देश पालटावयास वेळ तो लागेल किती? सुविचारींचा देश होणार आपले राज्य. लवकरच.

प्रधानजी : नि:संशय महाराज. आणि हे सारे आपल्या कृपेने आणि द्रष्टेपणामुळे महाराज. पण तूर्तास एक गंभीर खबर आहे महाराज.

महाराज : गंभीर? ठीक. एवढा एक विनोद वाचून घेतो आम्ही. गरज पडल्यास या नव्या गालिचावर लोळण घेतो म्हणजे आमची मानसिक तयारी होईल. त्यानंतर वळू गंभीर विषयाकडे.

प्रधानजी : जो आज्ञा महाराज

*दरबारात सारे मोबाईल मध्ये डोके घालून बसतात. महाराज एकाएकी हसायला लागतात. मध्येच जोरात हसतात. मग उठून खालच्या गालिचावर लोळू लागतात. दरबारी असली 'सोय' नसल्याने उभ्या उभ्याच हसतात. महाराज थोड्यावेळाने उभे राहून कपडे झाडायला लागतात.*

महाराज : प्रधांजी, आम्ही खूप खूष आहोत. तुम्ही हा गालिचा बसवून आमची चांगलीच सोय केलीत. या विनोदांमध्ये जागोजागी LOL, LOL लोळ लोळ असे लिहिलेले असते. तेव्हा लोळायला काही हवेच की.

प्रधानजी : महाराज, त्या LOL चा अर्थ… बरोबर, बरोबर. आपण घेतलात तोच बरोबर आहे. ROFL काय LOL काय.

महाराज : आता पुढचा विनोद वाचण्याअगोदर बोला काय गंभीर आहे ते.. पण त्या आधी हे ऐका.. अत्यंत महत्त्वाचे..

प्रधानजी : आज्ञा हुजूर

महाराज : बनाना अ डे कीप्स प्रॉब्लेम्स अवे.. कोणत्याही वेळी खावी केळी आणि होई समस्यांची होळी. हे शेवटचे यमक जुळले नसले नीट तरी व्हॉटस्यापी आहे ते समजून ऐकावे.

प्रधानजी : जी हुजूर.

महाराज : नुसती जी हुजुरी नको प्रधांजी, केळी मागवा. म्हणजे गंभीर प्रश्न सुटतील. कसे सुटतील ते विचारू नका. श्रद्धा ठेवा. श्रद्धा माणसाच्या अथांग जीवन सागराचा एक किनारा आहे. त्यावर पोहोचून जीवनाचे तरंगते तारू सुरक्षित ठेवा. शुभरात्री. तेव्हा यावेळी लगेच मागवावीत केळी.

प्रधानजी : आज्ञा महाराज.

*टाळ्या वाजवीत शिपायास बोलावतात.*

प्रधानजी : शिपाई त्वरेने जा आणि त्वरेने ये.

*शिपाई घाईत जाऊ लागतो.*

प्रधानजी : (ओरडत.. थांब लक्ष्मी कुंकू लावतेच्या चालीवर.. ) : थांब शिपाया आज्ञा देतो..

*शिपाई थबकतो एकाएकी. स्टॅच्यू स्टॅच्यू खेळतात लहान मुले तसा.*

प्रधानजी : आम्ही पूर्णविराम दिला नव्हता शिपाई, स्वल्पविराम दिला होता. त्वरेने जा नि त्वरेने ये.. स्वल्पविराम.. आणि एक डझन केळी घेऊन ये.. पूर्ण विराम. हिरव्या की पिवळया सालीची महाराज?

महाराज : ते या संदेशात लिहिलेले नाही. पण केळे कुठलेही असो. ते केळेच. जे मिळेल ते घेऊन ये.

प्रधानजी : शिपाई, धावत जा नि पळत ये. येताना केळी घेऊन ये.

प्रधानजी : ऑन युवर मार्क..

*शिपाई खाली शर्यतीसाठी बसावा तसा बसतो*

प्रधानजी : गेट सेट.. (हवेत हातानेच बंदुकीच्या गोळया झाडत) गो..

*शिपाई धावत सुटतो.*

महाराज : सांगावी ती गंभीर समस्या प्रधांजी.

प्रधानजी : हुकूम महाराज. गंभीर म्हणजे अति गंभीर समस्या आहे महाराज. आपल्या पिताजींनी देखील असल्या समस्येस कधीच तोंड दिले नसेल.

महाराज : ते खरेय, पण आता आमच्याकडे ज्ञान.. नव्हे ज्ञान भांडार आहे. समस्या असल्या तरी समस्यांवर उपाय आहेत. आपला शिपाई केळी घेऊन येतच असेल. या व्हॉट्स्यापी विद्यापीठातील ज्ञान दैनंदिन जीवनोपयोगी आहे. तुम्ही समस्या कथन तर करा. आम्ही काढू तोडगा त्याच्यावर. कालच आम्ही वाचलेय, विश्वास रखें, विश्वकी ऐसी कोईभी समस्या नहीं जिसका हल नहीं. सोच और विचार से दुनिया बदल सकती है! शुभ रात्री!

प्रधानजी : महाराज, सोच आणि विचार यांनी समस्या सुटेल, पण समस्या निर्माण होण्यास मात्र काही जणांची सोच आणि विचारच कारणीभूत आहे.

महाराज : याचा अर्थ आम्ही जे वाचले ते त्यांनी पण वाचले? तरीही लवकर सांगावे कसली समस्या आहे?

प्रधानजी : महाराज, समस्या ही आहे की हिंगणगाव येथील तीन तरूणांनी आपल्या नवीन कर पद्धतीबद्दल आवाज उठवला

आहे. त्यांचे म्हणणे हे की ही पद्धती अन्यायकारक आहे. गावोगावी ते जनतेस पटवून देत आहेत.. जनताही त्यास बळी पडते आहे असे वृत्त आहे आपल्या खबऱ्यांचे. आजवर असे कधी झाले नाही महाराज. वर या व्हॉट्सॅपी संदेशातून जनतेस हे संदेश क्षणार्धात पाठवत आहेत ते तिघे. आणि जनतेचा विश्वास या संदेशांवर बसत आहे चटकन. कर पद्धती बद्दल जनता विचार करत असल्याचेही वृत्त आहे. आजवर जनता कसलाच विचार करत नसे. आता या तीन देशद्रोही तरूणांनी त्यांस विचार करण्यास फूस लावली आहे. हे समस्येचे मूळ आहे महाराज. आणि यावर वेळेत तोडगा नाही निघाला तर ही विषवल्ली फोफावेल अशी भीती आम्हाला वाटत आहे.

महाराज : प्रधांजी, तुम्ही म्हणालात ते खरे आहे. अति गंभीर आहे समस्या. आमच्या पिताजींच्या दरबारातील चाणक्य सांगत, राजाचा, पर्यायाने राज्याचा मोठा शत्रू कोण असेल तर विचार. स्वतंत्र विचार करणारी जनता असेल तर राज्यास धोका कधीही उद्भवू शकतो. इतक्या लवकर त्याचा प्रत्यय येईल असे आम्हांस नव्हते वाटले. आम्ही विचार करीत आहोत. लवकरच आम्हाला समस्येवर उत्तर सापडेल. खात्री आहे आमची.

प्रधानजी : आपले खरे आहे महाराज. यावर उपाय सापडेलच. अशी कोणती समस्या असेल जिच्यावर तोडगा नाही?

महाराज : आणि न सुटल्यास केळी तर आहेतच! ( आतापर्यंत प्रधानजींनी सांगितलेले महाराज विसरले आहेत.. तेव्हा परत विचारतात ) पण असे काय अघटित घडत आहे आपल्या देशी?

प्रधानजी : हिंगणगावातील तीन माथेफिरूंस आपण नव्याने सुरू केलेला कर मान्य नाही..

महाराज : ही हिंमत? कोण आहेत ते?

प्रधानजी : आहेत कुणी यःकश्चित आणि क्षुद्र जंतू..

महाराज : खरेय प्रधांजी. (अचानक नाटकीपणे) हे जंतू.. हे जंतू आपल्या राज्यास पोखरून काढतील.. वाळवीसारखे पोखरतील हे एक एक खांब राज्याचे जे आमच्या पिताजींनी मेहनतीने उभे केले. आमच्या आजोबा नि पणजोबांनी राज्याची वीट अन् वीट घडवली.. त्यात छेद करतील. आम्हीही आमचे रक्त आटवून नि घाम गाळून हा राज्यशकट हाकत आहोत. आणि कुणी दीड दमडीचा उठतो नि आणि खिळखिळे करू पाहतो राज्याचे चिरे न चिरे? सोच आणि विचार.. प्रथम शत्रू. कुठे फेडाल हे पाप? इकडे उभा आहे

तुमचा बाप. आमच्या पोलादी तटबंदीवर शिर आपटताय.. इतकेही समजत नाही त्या अडाणी अन् विद्रोही तरूणांस? शिर तुटेल, शिरावरील शीर न शीर फुटेल.. पण आम्हास उमटणार नाही चरादेखील. पण नाही. विषवल्ली.. प्रधांजी म्हणाले ती विषवल्ली.. नाही फोफावू देणार आम्ही. आठवतेय आम्हाला.. कालच वाचले ते आम्ही.. किसी समस्या का हळ.. नव्हे हल चाहिए तो उसके मूलपर.. नव्हे मूळपरच घाव घालो. हिंदी कठीण आहे, पण असेच काही होते ते. शुभरात्री. तर मुळावरच घाव घालावा लागेल तेव्हा उखडून टाकू शकू आम्ही ही वल्ली! पिताश्री आम्ही हे करूच. आशीर्वाद द्यावा आम्हास..

*दरबारी एखाद्या नाटकातले स्वगत ऐकून वाजवाव्या तशा टाळ्या वाजवतात. महाराज त्याने चेव आल्यासारखे अजून स्वगत बोलू लागतात, तितक्याच नाटकी पद्धतीने..*

महाराज : समस्या.. समस्यांचा मेरूपर्वत उभा राहिला तरी तो लांघून.. ओलांडून जाऊ आम्ही. समस्यांचा सागर पोहून पैलतीर गाठू आम्ही. समस्यांच्या वन्हीतून आम्ही चालत राहू अंगावरच्या एकही जखमेची न बाळगता तमा. समस्यांच्या

घनदाट वनातून जंगली श्वापदांची भीती न बाळगता ओलांडून जाऊ ते कानन.. कारण आम्हास ठाऊक आहे.. तावून सुलाखून झळाळून बाहेर पडते तेच खरे कांचन. आम्ही हे सारे करू. जया अंगी मोठेपण.. तया यातना कठीण.. कठीण यातना आम्हास.. म्हणजेच आम्ही महान.. आणि टाकीचे घाव सोसल्यावाचून देवपण येत नाही.. नव्हे, याहून सोपे उदाहरण.. कालच वाचले आम्ही.. कढईत आंच लागल्यावाचून पोह्यांना चिवडापण येत नाही.. शुभदुपार.. चिवडा बनण्यासाठी पोह्यांना आगीत पोळून जावेच लागत असेल तर आम्हालाही अशी समस्येची अग्निपरीक्षा द्यावीच लागेल. मग आम्हीही बनू चिवडा.. नाही.. प्रभू रामचंद्र आमचा आदर्श आहेत. सीतामाईनी दिली तशी इथे प्रत्यक्ष आम्ही देणार आहोत.. अग्निपरीक्षा. पण प्रधांजी, आम्ही हे मुखोद्गत स्वगत म्हटले खरे, पण समस्या काय होती त्याचाच परत विसर पडला आहे आम्हास. मूळ समस्येच्या मुळावर घाव घालावा इतपत आठवते आम्हांस, पण मुळात मुद्दा कोठला ते जरा कथन करावे.. मूळ समस्या कोणती?

प्रधानजी : जो आज्ञा हुजूर.. हिंगणगावचे तीन तरूण तुर्क जे आपल्या राज्यात समस्या निर्माण करण्यात आहेत गर्क! हीच ती समस्या महाराज!

महाराज : अशी समस्या आजवर न देखिली न ऐकिली. आमच्याच आदेशाबद्दल नाराजी अन निषेध? वर जनतेस फूस? गहन आहे समस्या. आम्ही आजवर स्वतःस अवध्य समजत होतो..

प्रधानजी : अवध्य?

महाराज : तसेच काहीतरी प्रधांजी. पण ही समस्या गहन आहे. केळी.. कुठेत ती केळी.. सकल समस्या हारक.. समस्याधारकास पावक.. शिपाई केळी आणायला गेलाय की झाड लावून ते उगवून केळ्याचा घड लागण्याची वाट पाहतोय?

प्रधानजी : क्षमा असावी महाराज, थोडा विलंब झाला..

महाराज : चालेल, आम्ही कालच वाचलेय, सबुरी का फळ गोड म्हणून. तर गोड केळ्याची वाट पाहू आपण.

प्रधानजी : दुसरा शिपाई..

*दुसरा शिपाई येऊन उभा राहतो..*

प्रधानजी : शिपाई, पहिला कुठे गेला हे तातडीने बघून ये. पळत जा नि धावत ये.. नाही, धावत जा आणि पळत ये..

*शिपाई धूम ठोकत निघून जातो. तोच पहिला शिपाई हातात सहा केळी घेऊन धापा टाकत येऊन उभा राहतो..*

महाराज : आले.. आमचे समस्या समाधान आले.

प्रधानजी : शिपाई आलास.. तू दम खा.. महाराज खातील केळी.

महाराज : प्रधानजी, आम्ही केळे खातो तोवर यास इतका उशीर का झाला ह्याची चौकशी करा.

प्रधानजी : आज्ञा महाराज.

*महाराज केळे हाती घेतात. त्यास नमस्कार करून त्याकडे श्रद्धेने पाहू लागतात. मग ते अलगद सोलू लागतात. तोवर प्रधानजी आणि शिपाई एकमेकांशी हळूच बोलू लागतात. थोड्या वेळात प्रधानजी महाराजांसमोर उभे राहतात. तोवर महाराजांनी अर्धे केळे खाल्ले आहे.*

महाराज (तोंडातल्या केळयाच्या घासासकट) : प्रधांजी, बोलावे ऐकतोय आम्ही.

प्रधानजी : महाराज, आपल्या राज्यातील केळी संपलीत. काल तो केळयांचा संदेश सगळीकडे पोहोचला. राज्यभरातील जनता केळी खातेय सकाळपासून. औषधालाही एक केळं सापडेना.

महाराज : मग?

प्रधानजी : मग आपल्या शूर शिपायाने एका घरात घुसून सहा केळी पळवून आणलीत. त्या अतिसामान्य नागरिकाच्या सामान्य समस्यांपेक्षा राज्याच्या समस्या सोडवणे जास्त गरजेचे महाराज. शिपाई धावत पोहोचला पण केळयांच्या शोधास विलंब झाला त्यास. आणि जशी मिळवली त्याने ती, तो तडक धावत धडक पोहोचला येथवर.

महाराज : ठीक आहे. राज्यातील समस्त केळी उत्पादकांस तत्काळ नोटिस पाठवा. एक घड रोज आमच्या महाली पोहोचलाच पाहिजे.

प्रधानजी : हुकूम हुजूर. पाठवतो अशी नोटिस. आपण केळे अजून घ्यावे महाराज.

महाराज : आम्ही तर घेऊच. एका केळयावर सुटणारी समस्या नाही ही. अधिकस्य अधिकं फलं. प्रधांजी, दरबार बरखास्त. ही केळी पाठवून द्या महाली. आम्ही चिंतन करत खातो ती. आम्हास

खात्री आहे उद्यापर्यंत समस्या सुटलेली असेल. पण रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग.. म्हणून वेळोवेळी आम्ही खाऊ केळी. रोज खा केळी समस्यांची करा होळी.. शुभप्रभात. आणि दरबार बरखास्त.

प्रधानजी : आज्ञा हुजूर.

दरबारी : चक्रमादित्य महाराजांचा विजय असो.

३

महाराज दरबारात प्रवेश करत आहेत..

सर्व दरबारी :

नमन नटवरा विस्मयकारा

तूच देशीचा तारणहारा

असो प्रभात वा दुपार टळटळीत

अढळ तू बाकी सगळे डळमळीत

तू एकच एक या गगनी तारा

नमन नटवरा विस्मयकारा

*महाराज येतात. एका हातात मोबाईल. दुसरा हात केळ्यांचा घड पकडण्यात गुंतलेला. कसेबसे एका हाती मोबाईलच्या स्क्रीनवर वरखाली करत पोहोचतात. कालच्याच जागी परत तसेच धडपडतात. केळी पडतात पण मोबाईल सलामत.. त्याकडे समाधानाने बघतात.*

*दोन शिपाई धावत येऊन केळी उचलून देतात त्यांना. महाराज एका हाती मोबाईल दुसऱ्यात सोललेले केळ घेऊन बसतात. एक जांभळा गुलाब सर्वांना दाखवून*

महाराज : गुड मॉर्निंग.. प्रधांजी

प्रधानजी : गुड मॉर्निंग महाराज.

महाराज (मोबाईल मध्ये वाचत) : ज्याने कधी कुठलीही समस्या तोंड दिली नसेल तो मनुष्यच नव्हे. सुप्रभात.

प्रधानजी : सुप्रभात

महाराज : थोडे व्याकरण चुकीचे आहे पण तत्वज्ञान मात्र खरेच प्रधांजी. मला वाटते गीता सोपी करून सांगितली कृष्णाची ज्ञानेश्वरांनी तशी तत्वज्ञाने सोपी करून सांगणारी ही शाळा आहे. गेल्या काही दिवसांत आम्ही कितीतरी शिकलो. काही नाही तर अठरा केळी खाल्लीत आम्ही. राज्य करायचे म्हटले इतके तर करायलाच हवे ना प्रधांजी?

प्रधानजी : महाराज लयभारी.. ल.भा. म्हणजे ऑसम.. ग्रेट..

महाराज : थ्यांक्स. तर आम्ही काल केळी खाल्ली. आजही खाल्ली. आमच्या डोक्यात आयडियाच आयडिया जमा झाल्यात आता. ते तीन तरूण आणि त्यांनी भडकवलेली लोकांची

माथी. पण त्याआधी तुम्ही देखील तुमच्याकडील ऐकवा सुविचार प्रधांजी..

प्रधानजी : हुकूम महाराज (मोबाईल मध्ये शोधत..) हां. ऐकावे महाराज.

महाराज : नाही. सुविचार फक्त आमच्यासाठी नाहीत, सर्व दरबारी जनांसाठी आहेत. सर्व जनांनी ऐकावे, सर्व जनांनी शिकावे, सर्वांनी व्हावे शहाणे.. क्षणार्धात

प्रधानजी : ल.भा. महाराज. आपण हेच लिहून पाठवावे आम्हास, आम्ही सर्वांस आपल्या नावे फॉरवर्ड करू..

महाराज : अवश्य प्रधांजी. फेसबुकावरही टाकू.. फेसबुकातील आमच्या अकाउंटास आम्ही चक्रम- अका-उंट नाव दिले आहे. त्यावर आमचा उंटावरचा फोटो आहे. त्यावरही आम्ही टाकू तो.

प्रधानजी : ल.भा. महाराज. हजारो लाइक्स कन्फर्म्ड महाराज. तर आजचा विचार असा आहे.. काही करण्याआधी नीट विचार करा कारण पाठवलेला संदेश कधीच परत येत नाही. शुभ दुपार!

महाराज : हे छान आहे प्रधांजी, आम्हास भल्या पहाटे शुभरात्रीचा संदेश येतो तर रात्री सुप्रभात! असू देत.. काही शुभ

असण्यासाठी वेळेचे बंधन कशाला? छान. आमच्या दरबारी जनांनी या साऱ्यांचे मनन करावे अशी आमची आज्ञा आहे.

प्रधानजी : हुकूम महाराज. आम्ही सर्वांस शाळकरी विद्यार्थ्यांसारखे रांगेत बसवून घोकून घेतो एक एक संदेश. आणि शाळा महाविद्यालयात देखील हे सक्तीचे करू आम्ही. दररोज शुभ संदेश वाचनाशिवाय कोणासही दैनंदिन कामे सुरू करता येणार नाहीत असा आदेश काढतो आम्ही.

महाराज : प्रधांजी, आम्ही खूश आहोत. हे करावेच आपण. म्हणजे आपले राज्य सुविचारी होईल.

प्रधानजी : आज्ञा महाराज.

महाराज : तर आम्ही केळी खाऊन समस्या सोडविली आहे.

प्रधानजी : आपण हुकूम करावा महाराज.

महाराज : जे तीन तरूण आपल्या निरागस जनतेची निरागस माथी भडकवत आहेत त्यांना लागलीच ताब्यात घ्यावे. कैदेत ठेवावे. त्यांच्यावर सक्त नजर ठेवावी.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आम्ही तातडीने तसा संदेश हिंगणगावी सुरक्षा व्यवस्थापकांस पाठवितो.

*प्रधानजी मोबाईलवर संदेश टाईप करतात. तोवर महाराज अजून एक केळे खातात. खाता खाता मोबाईलवरील संदेश वाचतात. एका ठिकाणी त्यांना जोरदार हसू फुटते. तोंडात केळे ठेऊन कसेबसे हसतात.*

प्रधानजी : पाठविला संदेश महाराज. दोन निळया खुणादेखील आल्या. आता लवकरच ते तीन देशद्रोही आपल्या ताब्यात येतील.

महाराज : शाबास प्रधांजी, अगदी जलद कारवाई होते आहे. हिंगणगावाहून त्या तिघांस थेट कैदेत टाका. मुसक्या बांधून. एक समस्या सुटली आपली. हे केळ खाणे म्हणजे समस्या सुटण्यास अति उपायकारक आहे. या मोबाईलचे अनंत उपकार

आमच्यावर. आणि या केळयांचेही. आम्ही आता बाकीचा राज्यकारभार बघण्यास मोकळे झालो. आमच्या राजरत्न गजराजांचे कसे काय?

प्रधानजी : महाराज, राजवैद्य आणि आमच्यात यावरून खडाजंगी झाली.

महाराज : प्रत्यक्ष राजवैद्यांशी?

प्रधानजी : होय महाराज. आम्ही त्यांस पाठविलेले उपचार ते व्यवस्थित करताना आढळले नाहीत. आम्ही स्वतः गुगल मावशीकडून

उपचार शोधून दिले. राजवैद्यांस फक्त त्यांची अंमलबजावणी करणे बाकी होते. पण राजवैद्य स्वतःच्या ज्ञानाची फुशारकी मारत उपचार करू इच्छित होते. आम्ही आक्षेप घेतल्यावर त्यांनी उपचारासच नकार दिला. आम्ही तेव्हा ओसाडगावीच्या वैदूकरवी उपचार करून घेत आहोत. गुगल मावशीच्या मदतीने.

महाराज : वा! आम्ही प्रसन्न आहोत. मावशीचे काम चोख अगदी. आम्हास वाटते आता मावशीच्या मदतीने सारीच कामे निपटतील. पण राजरत्न कसे आहेत आमचे?

प्रधानजी : वैदूजी प्रयत्नांची शर्थ करत आहेत महाराज. अजून हाड जुळण्याची शक्यता वाटत नाही त्यांस. पण एवढा मावशीने सांगितलेला उपाय करूनही नाही सांधले हाड तर दैवगतीचा फेरा.. आणि काय?

महाराज : खरंय प्रधांजी, माणसाच्या आयुष्यात महत्त्वाचे दोन द.. देव आणि दैव.. माणसाला आयुष्यात काय हवे.. दवा आणि दैवत.. माणसाने काय जोडावे.. दिल आणि देऊळ.. माणसाने काय तोडावे.. दीवार आणि दिवानापन.. माणसाने काय वाचवावे.. दमडी आणि.. दौलत

प्रधानजी : वा! ल.भा. महाराज. आम्ही आधी कधी वाचला नाही हा संदेश?

महाराज : कसे वाचाल? आम्हीच तो आता बनवलाय.. बघता बघता. आम्ही तो सर्वांस पाठवू.. आमच्या फे.बु.अका-उंटावर पण टाकतो..

प्रधानजी : छानच महाराज. ल.भा. क्षमा असल्यास एक सांगू महाराज?

महाराज : सांगावे प्रधांजी..

प्रधानजी : आपला संदेश ऐकून वाटते ना की महाराज तुस्सी ग्रेट हो!

महाराज : धन्यवाद प्रधांजी. आता ते देशद्रोही आले असतील आपल्या कैदखान्यात?

प्रधानजी : महाराज, आम्ही संदेश धाडला त्यास दहा मिनिटेच लोटली. थोडा वेळ तर लागेल महाराज. क्षमा असावी.

महाराज : तत्काळ संदेशवहनासारखे मानवी वहनही तत्काळ झाले असते तर किती चांगले झाले असते. ते देशद्रोही आता आमच्या चरणी असते. आमच्या विरूद्ध असे काही? आम्हांस राज्याच्या चिंतेने रात्र रात्र निंद येत नाही. रात्र रात्र आम्ही तळमळत काढतो. चिंता आणि चिता.. एका अनुस्वाराचा फरक. पण पहिली माणसास दुसरीवर पोहोचवते. म्हणजे ती चिंता आपल्याला चितेवर पोहोचवते.. शुभरात्री.. आम्ही वाचलेय हे. आम्ही नाही तर राज्य नाही. आमच्या विरोधात जाण्याची हिंमत कशी होते

कुणाची. दीड दमडीचे तीन तरूण.. आमच्या कराबद्दल लोकांची दिशाभूल करतात हे द्रोही. आणि आमची जनता पण त्यांचे ऐकते? आणि आमच्या रथी महारथी सुरक्षा यंत्रणांस पत्ताही लागत नाही? आम्ही बंदोबस्त करूच त्यांचा, पण या थरावर गोष्टी पोहोचल्याच कशा.. आम्हास अन्न गोड लागत नाही. काल खाल्लेला झणझणीत पांढरा रस्सा गोड लागला नाही आम्हास. बाहेरील शत्रूचा बंदोबस्त कुणीही करेल, पण आतील ही वाळवी.. दिमक.. त्यास कोणी लगाम घालावा? खरेय आम्ही कालच वाचले ते, माणूस हाच माणसाचा सर्वात जवळचा मित्र आणि सर्वात मोठा शत्रूही असतो..

प्रधानजी : महाराजांची व्यथा ही सगळ्या जनतेची व्यथा. महाराजांनी चिंता करू नये. लवकरच ते देशद्रोही इकडे पोहोचतील.

महाराज : आम्ही व्यथित आहोत ते असे होऊ शकले म्हणून. यास कारण विचार. विरोधी विचार. जनतेस असा विचार करण्यास दुसरा कोणता विषय नाही? विचार ही एक नशा आहे. विचारांची नशा ही कोणत्याही नशेहून जास्त घातक. स्वत:स विचारी समजणारे सर्वात घातक. शुभरात्री.. आम्हास वाटते विचारांपेक्षा सुविचार चांगले. आपापल्या व्हॉट्स्यापी येणारे. त्यातून शहाणे करून सोडावे सकल जन..

हे ब्रीद आहे.. या विद्यापीठाचे. आम्ही अजून काय कामकाज करणार आहोत प्रधांजी?

प्रधानजी : महाराजांनी विश्राम करावा. आम्ही बाकी कारभार पाहून घेऊ. आणि ते तिघे पोहोचले की त्यांची झाडाझडती घेऊ जातीने.

महाराज : असे म्हणता प्रधांजी? मग दरबार बरखास्त? आम्ही तातडीने आमच्या या उद्वेगावर उपाययोजना करतो. यास आमच्या मोबाईलवरील विनोदांचाच उतारा योग्य. पण इथे लोळण न घेता आम्ही आमच्या शयनयानात डायरेक्ट लोळूनच वाचतो ते.. म्हणजे वेगळी लोळण घ्यावी लागणार नाही आम्हांस.

प्रधानजी : खरे आहे महाराज.

महाराज : आणि एक प्रधांजी, सुविचारांबद्दलचे विचार आम्ही सांगितले.. तर आपल्या दरबारी जनांकडून सारे सुविचार दैनंदिन वाचून घेतले जात आहेत वा नाही?

प्रधानजी : आपल्या आज्ञेनुसार महाराज, आम्ही जातीने ध्यान देऊन आहोत. रोज सर्वप्रथम आम्ही सर्वांस शुभ प्रभातीचा संदेश धाडतो. त्यानंतर ते आम्हास नवीन संदेश धाडतात. आम्ही सगळ्यांची नोंद ठेवतो. त्यानंतर दरबारात येताना एक एक

दरबारी जनास तो संदेश म्हणून दाखवावा लागतो. शाळा व महाविद्यालये यांत हीच योजना राबवण्याचे आदेश काढले आहेत शिक्षण मंत्र्यांनी. त्या संदेशांमुळे जन सारे आता सुविचारी झाले आहेत. आता तो दिन दूर नाही जेव्हा सर्व जनताच सुविचारी होईल. आणि सुभाषित होईल.

महाराज : प्रधांजी, आम्हाला आमचा अभिमान वाटतो. आम्ही आहोत म्हणून राज्य आहे. आता आम्ही निघतो. केळी खाऊन समस्या सोडवायला आता समस्याच उरल्या नाहीत.. तेव्हा केळी बंद सध्या. आज आम्ही या मोबाईलवरून तातडीची कामे तातडीने संपवतो. तोवर तुम्ही बाकी सारे सांभाळा. दरबार बरखास्त..

प्रधानजी : आज्ञा हुजूर

दरबारी : महाराज चक्रमादित्यांचा विजय असो.

४

महाराज दरबारात येत आहेत..

सर्व दरबारी :

नमन नटवरा विस्मयकारा

तूच देशीचा तारणहारा

काय वदावा थाट तुझा मी

तू तर तीनही जगीचा स्वामी

दुर्जनांस तू दाविशी कारा

नमन नटवरा विस्मयकारा

*महाराज येतात. हातात मोबाईल घेऊन खाली पाहात. मध्येच हसतात. हसत हसत सिंहासनाच्या पुढे निघून येतात. एकाएकी लक्षात आल्यावर परत मागे जाऊन सिंहासनावर बसतात. मोबाईलवरील सप्तरंगी फूल दाखवत..*

महाराज : गुड मॉर्निंग.. सुप्रभात.. शुभ सकाळ

प्रधानजी : सुभसखाळ महाराज..

महाराज : म्हणजे प्रधांजी?

प्रधानजी : नाही.. इंग्रजीत लिहिलाय ना संदेश.. म्हणजे शुभ सकाळ.

महाराज (मोबाईल मधून वाचत) : हम सब समस्याओंसे घिरे हुए हैं. कौनसा ऐसा है इन्सान जिसे समस्या का सामना नहीं करना पडा हो. समस्या पर आप हावी हो जाओ न कि समस्या आपपर. आपका दिन शुभ हो. शुभ निशा. किती छान संदेश. पण आम्ही आज एकही केळ नाही खाल्ले अजून.

प्रधानजी : आपला संदेश अत्यंत समर्पक आणि ल.भा. आहे महाराज. आज महाराज प्रसन्न दिसत आहेत. महाराज प्रसन्न म्हणून आम्ही प्रसन्न, आम्ही प्रसन्न म्हणून दरबारी प्रसन्न, ते प्रसन्न म्हणून सारी जनता प्रसन्न. सारे राज्य आज प्रसन्न आहे. या आनंदास कुणाची दृष्ट ना लागो.. एक विनंती आहे महाराज..

महाराज : बोलावे प्रधांजी..

प्रधानजी : आम्ही नुकतेच एक वाचले आमच्या व्हॉट्स्यापी.. त्यात म्हटले आहे की आपल्या पूर्वजांनी अतिशय शास्त्रीय दृष्टिकोनातून आणि विचारपूर्वक सांगून ठेवले आहे.. आनंदाच्या प्रसंगी सर्वांनी दोन मिनिटे रडण्याचा आवाज

केला तर आनंद चिरकाल टिकतो. शास्त्रीय आधार आहे यास. मानवी मेंदूतील संरचनेस एका ठिकाणचे संदेश दुसरीकडे घेऊन जाणारी जी गुंतागुंतीची रचना असते त्यातील एका मज्जातंतूतून रडण्याच्या लहरींमुळे निर्माण होणाऱ्या विद्युत आणि कंपन लहरींचे संशोधन करून शास्त्रज्ञांनी..

महाराज : थांबावे प्रधांजी, एकतर आपल्या पूर्वजांनी सांगून ठेवलेय ना.. ते चुकीचे कसे असेल? आणि व्हॉट्स्यापी आहे.. तेव्हा त्याबद्दल प्रश्नच नाही. तेव्हा आता, आज म्हणजे ताबडतोब होऊन जाऊ देत.. दोन मिनिटे रूदन. सर्वांनीच रडले पाहिजे.. उज्ज्वल उद्यासाठी. शाश्वत आनंदासाठी.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आम्ही रडू, दरबारी रडतीलच. आनंदासाठी. दोन मिनिटे रूदन..

*सर्व दरबारी आणि महाराज रडू लागतात. दरबारात रडण्याचा आवाज भरून राहतो. दोन मिनिटांनी हा प्रकार संपतो.*

महाराज : तर रडण्यामुळे दिवसाची सुरूवात फारच सुंदर झालेली आहे. आता आनंदीआनंद. चिरकाल! बोला प्रधांजी,

राज्यकारभाराची हालहवाल. बोला. (प्रधानजी मोबाईल मध्ये व्यस्त आहेत..) प्रधांजी, लक्ष नाही आपले?

प्रधानजी : नाही महाराज, अत्यंत महत्त्वाचा संदेश..

महाराज : वाचा. महत्त्वाचा संदेश सर्वांस कळू देत..

प्रधानजी : माकड बना. शुभदिन

महाराज : हा असा संदेश?

प्रधानजी : महाराज, अत्यंत गंभीर आणि खोलवर अर्थ असलेला संदेश आहे हा.. माकड बना. म्हणजे, चार माकडांसारखे बना.. शुभ बोला, शुभ लिहा, शुभ वाचा, शुभ ऐका.. महाराज.. आपण कोणते माकड होणे पसंत कराल..

महाराज : प्रधांजी..?

प्रधानजी : क्षमा महाराज. पण असे त्या संदेशातच लिहिले आहे.

महाराज : योग्य. अति योग्य. आणि व्हॉट्स्यापी संदेश आहे म्हणजे अति अचूक. आमच्यासाठी काय शुभ वार्ता आहे प्रधांजी.. आपल्याच संदेशानुसार आपल्याला शुभ बोलावेच लागेल. तेव्हा द्यावा शुभसंदेश. आम्ही आतुर आहोत.

प्रधानजी : हुकूम महाराज. आणि आपले कान जे ऐकण्यास आतुर झाले आहेत ती बातमी सांगतो आहोत आम्ही.

महाराज : बोलावे प्रधांजी. नक्कीच त्या देशद्रोही तरूणांबद्दल असणार. आले का ते? चांगल्याच मुसक्या आवळा त्यांच्या. आमच्याशी द्रोह म्हणजे राजद्रोह. आमच्यावर टीका म्हणजे देशद्रोह. कळू देत त्यांना.

प्रधानजी : होय महाराज. तिकडून आपल्या कैदखान्यात दंडाबेडीची शिक्षा देत तिघांस डांबून ठेवले आहे.

महाराज : म्हणजे तिघे गयावया करत आहेत. चूक झाली म्हणत आहेत. हातापाया पडत आहेत. आम्हास ठाऊक आहे.. हे असेच होणार. पण चुकीला माफी नाही.. हा असंतोषाचा उद्गार मुळापासूनच खुडून काढा..

प्रधांजी : क्षमा असावी महाराज, पण त्यांनी यातले काहीच केले नाही.. अजून तरी. उलट त्यांची चूक काय याची विचारणा करीत आहेत ते. तसे पत्रच त्यांनी न्याय मंत्र्यांना लिहिले आहे.

महाराज : खामोश! आमच्या समोर ही मगरूरी? ताबडतोब त्यांना कैदेत टाका..

प्रधानजी : ते आता कैदेतच आहेत महाराज..

महाराज : असतील.. पण अजून कैदेत टाका! कळू देत राजद्रोहाचा परिणाम आणि मिळू देत सजा..

प्रधानजी : हुकूम महाराज..

महाराज : आमचा आदेश आहे.. त्या तिघांस बोलू द्यावे.. फक्त ऐकणारा कुणी नाही समोर हे पहावे. आमच्या राज्यात ते देशद्रोही विचार कुणाच्या कानी पडून ते कलुषित होणार नाहीत हे पहावे आणि त्यांना बंद भिंतींत हवे तितके कोकलू द्यावे.

प्रधानजी : हुकूम महाराज.

महाराज : अजून काही खबरबात?

प्रधानजी : गजराजांची प्रकृती..

महाराज : बोला. कसे आहेत राजरत्न?

प्रधानजी : चिंताजनक. महाराज सारे उपाय थकले. आम्ही स्वतः गुगलमावशीकडून उपाय शोधून थकलो. वैदूराज शर्थ करीत आहेत..

महाराज : प्रधांजी, आमची इच्छा आहे की शेवटचा प्रयत्न म्हणून वैदूराजांऐवजी वैद्यराजांस पाचारण करावे. आम्हास ठाऊक आहे त्यांना आपणच दूर ठेवले गजराजांपासून. पण आता उपाय थकले तर त्यांचा सल्ला घेतला जावा.

प्रधानजी : हुकूम हुजूर. राजवैद्य आमच्या उपायांशी सहमत नव्हते म्हणून आम्ही त्यांस दूर केले. त्यांना आपल्या ज्ञानाचा गर्व फार. पण आता ही सारी माहिती मावशी पुरविते.

महाराज : आपले म्हणणे पटते आम्हास, पण गजराजांसाठी एक संधी द्या.

प्रधानजी : आज्ञा हुजूर. (प्रधानजी मोबाईलवर संदेश लिहित) पाठवला महाराज वैद्याराजांस संदेश.

महाराज : वा! किती तातडीने! आम्ही आमच्यावरच खूश आहोत. अजून काही प्रधांजी?

प्रधानजी : महाराज आपल्या राज्यातील एक वर्तमानपत्र चक्रमपुर दिनांक याच्या संपादकास आपली मुलाखत घ्यावयाची आहे. त्यासाठी परवानगी मागण्यास पत्र लिहिले आहे संपादकाने.

महाराज : चक्रमपुर दिनांक? ज्याने या तीन तरूणांस प्रसिद्धी दिली तेच?

प्रधानजी : होय महाराज. तेच. संपादक स्वतःस अति शहाणे समजतात. आम्हाला वाटते की..

महाराज : वार्ता.. चक्रमपुरी राज्य वार्ताच्या संपादकास बोलवावे मुलाखतीस. ते आमचे दोस्त आहेत. त्यांना मुलाखत दिली की आपोआप दिनांकचे नाक कापले जाईल. आणि वार्ताकारांनी कोणते प्रश्न विचारावेत हे सांगण्याचीही गरज नाही इतके ते आम्हास ओळखतात.

प्रधानजी : आज्ञा हुजूर. आमची अजून एक सूचना होती महाराज, आपण मंजूर केल्यास..

महाराज : बोलावे प्रधांजी, आपण सदा आमच्या म्हणजे राज्याच्याच भल्याचा विचार करता..

प्रधानजी : धन्यवाद महाराज. आमचे म्हणणे असे होते की, राज्याच्या जाहिराती आपण दिनांकला देणे बंद करावे.

महाराज : खरेच आहे. देशद्रोही वृत्त देणारे यासच लायक आहेत. पण आमचा आदेश यापुढील असा आहे की, राज्याच्या जाहिराती तर देऊ नयेतच पण जे कुणी अन्य देतील त्यांसही काळ्या यादीत घालावे. देशद्रोह्यांची कोंडी केल्यावाचून आपली प्रगती होणार नाही.

प्रधानजी : हुकूम हुजूर. आम्ही त्वरित आदेश काढतो.

महाराज (रागावत) : प्रधांजी.. आपण आमच्या सेवेत किती वर्षे आहात?

प्रधानजी : आपली कृपा आहे महाराज.. सहा वर्षे दोन महिने दोन दिवस पंधरा तास सव्वीस मिनिटे अठरा सेकंद..

महाराज : आम्ही अत्यंत खफा आहोत..

प्रधानजी : क्षमा महाराज. आमची चूक मोठ्या मनाने आपल्या सुटाच्या वरच्या खिशात घ्यावी.

महाराज : प्रधांजी, आम्ही दिलेले हे या प्रकारचे आदेश लेखी आदेश नाहीत. अलिखित आहेत. आपणास हे कळू नये याचे आश्चर्य वाटते. यातील आदेश कुण्या बोरूबहाद्दर पत्रकाराच्या हाती पडल्यास काय अनर्थ घडवतील ते. आम्ही निस्तरू ते, पण जनसेवेचा किती समय त्यात व्यय होईल?

प्रधानजी : माफी महाराज, आमच्या ध्यानी ते लगेच आले नाही. जशी आपली आज्ञा. लवकरच आम्ही वार्ताच्या संपादकांस आपली प्रदीर्घ मुलाखत घ्यावयास सांगतो.

महाराज : लय भारी प्रधांजी. त्यातून आम्ही नवीन कर पद्धतीबद्दलचे जनतेचे गैरसमजही दूर करू.

प्रधानजी : असा दिन रात महाराजांनी राज्याचा विचार करू नये. विश्रामही घ्यावा महाराज. लाखांच्या पोशिंद्याचे आयुष्य त्याचेच नसून ते सर्वांचे असते. तेव्हा आराम करावा..

महाराज (मोबाईल मधून वाचत) : काम हाच ज्याचा आराम असेल अशा माणसाने आराम कसा करावा? शुभसंध्याकाळ. आमचे हे असे झाले आहे प्रधांजी. कामाच्या रगाड्यात आमचे या मोबाईलकडेही दुर्लक्ष होते की काय आम्हास भीती वाटते. पण रातदिन जागून आम्ही सारे संदेश.. ते चार असोत की चारशे की चार हजार.. सारे वाचून काढू. त्यांस

त्वरित उत्तर ही धाडू आम्ही. डिजिटल बनण्यासाठी एवढे आम्हास करावेच लागेल! ते तीन तरूण कैदेत.. वार्तामधून आमचे मनोगत आम्ही जनतेस सांगू.. सारा असंतोष मावळेल.. एखाद्या बर्फाने वितळावे तसा. जनता आमच्यावर खूश होऊन न किरकिरता दोन्ही करांनी करभरणा करेल. आपल्या भरलेल्या राज्य तिजोरीकडे पाहात बसू आम्ही. मग केळी पुन्हा खाण्याची वेळ आमच्यावर नाही येणार.. आम्ही स्वप्नात तर नाही ना प्रधांजी.. राणीसाहेब असत्या तर त्यांस चिमटा काढायला सांगितले असते.. असू देत.. (मोबाईल मध्ये वाचत) सारी स्वप्ने सत्यात येण्यासाठी सत्य काय याचा शोध घ्या. शुभ मध्यरात्र. कामाचा शीण जाणवतो आम्हाला. त्याच कामाच्या शिणवट्यामुळे आम्ही आता दरबार बरखास्त करतो. आम्ही सत्याचा शोध घेतो आता.

प्रधानजी : हुकूम महाराज. बाकी कारभार आम्ही करतो. महाराजांनी निश्चिंत असावे..

सारे दरबारी : महाराजांचा विजय असो.

५

महाराज दरबारात येत आहेत..

सर्व दरबारी :

नमन नटवरा विस्मयकारा

तूच देशीचा तारणहारा

खात कोणी ते दात न ओठ

आचारी सतराशे साठ

तूच एक बुंदीचा झारा

नमन नटवरा विस्मयकारा

*महाराज येतात. त्रस्त चेहरा. हातात सोललेले केळे. गळ्यात माळ अडकवावी तसा केळीचा घड. एका हाती मोबाईल, त्यात लक्ष. नेहमी अडखळतात त्या जागेवर शिताफीने उडी मारून पुढे जातात आणि सिंहासनावर बसतात. एकापाठोपाठ केळी खात बसतात. पिकदाणी*

*सारखे भांडे घेऊन शिपाई केळ्यांची सालं महाराजांकडून गोळा करतो. दरबार शांत आहे. प्रधानजी वाट बघत थांबतात. महाराज आज क्रोधमग्न आहेत.. क्रोधमग्न हा महाराजांचाच शब्द. सारे दरबारी समजून चुकतात आणि जीव धरून बसून राहतात.*

महाराज : आमच्या वार्तामधील मुलाखतीनंतरही हे असे कसे झाले प्रधांजी?

प्रधानजी : क्षमा महाराज, आम्ही चौकशी करून सांगतो महाराज.

महाराज : चौकशी? अजून चौकशी आटोपली नाही? दोन दिवस राज्य धुमसते आहे आणि अजून चौकशी नाही झाली? जनतेची माथी का आणि कुणी भडकवली? आम्ही आमच्या मुलाखतीत जिवतोड सांगितले ते न पटता जनतेने आमच्याच राज्याविरोधात आमच्याच राज्यात अशी आंदोलने करावीत? आणि ती ही अशी. आणि तुम्ही अजून चौकशीच करत आहात?

प्रधानजी : क्षमा महाराज, पण सकाळी हे सुविचारी संदेश गोळा करण्याचे मोठे काम होते, त्यात वेळ कमी मिळाला. आम्ही आताच आदेश देतो.

महाराज : काहीही करा, पण आम्हाला माहिती मिळालीच पाहिजे.

प्रधानजी : हुकूम महाराज.

*प्रधानजी आपल्या मोबाईलमध्ये संदेश लिहितात. तोवर महाराज घडातून एक एक केळ तोडून खातात. आपल्या मोबाईलवर वाचत वाचत. कुठेतरी त्यांना हसू फुटते. पण लगेच आपल्या क्रोधमग्न अवतारात बसतात. थोड्या वेळानंतर..*

प्रधानजी : महाराज, आम्हाला मिळाली आहे माहिती. त्या तिघांनी न्याय मंत्र्यांना लिहिलेले पत्र दिनांक ने छापले. ते वाचून लोकांची माथी भडकली. त्यामुळे ही आंदोलने होत आहेत महाराज.

महाराज : दिनांक! आम्ही केळी खाऊन या प्रकरणातून काय काय शिकलो आहोत.. पण आम्हाला कळत नाही.. असल्या देशद्रोही इसमांना असले पत्र वगैरे लिहू देणे चुकीचे की न्यायमंत्री म्हणून कुणी मंत्री असणेच चुकीचे? नाही.. तसे मंत्री हवेत. हवेतच. पुरोगामी राज्यात न्याय हा शब्द परवलीचा. फक्त न्याय म्हणजे काय आणि ते देणारे मंत्री कोण असावेत हे आम्ही ठरवले पाहिजे. आणि आरोपीस असली पत्रे लिहिण्यास मज्जाव..? पुरोगामी राज्यात ते

शक्य नाही.. पण थांबा.. केळे खाल्ले की सुचेल काही.. ( महाराज केळे सोलून खातात.. शिपाई साल गोळा करायला भांडे पुढे करतो.) यस, सुचले. प्रधांजी..

प्रधानजी : जी महाराज..

महाराज : यापुढे आरोपी न्याय मंत्र्यांस पत्र लिहितील.. त्याचा एक छापील मजकूर बनवा. पत्रात नाव बदलावे आरोपी कुणी असेल त्यानुसार. आणि मजकूर.. तो मोघम ठेवावा. आमच्या न्यायदान व्यवस्था सुधारणा मोहिमे अंतर्गत हे नवीन काही सुरू करा. त्यास 'चक्रमादित्य न्यायदान सुलभीकरण' असे नाव द्या. जनतेस पटवून द्या ह्यामुळे अशिक्षित आरोपींस किती मदत होणार आहे.. आणि ही बातमी छापून आणा सगळीकडे.

प्रधानजी : हुकूम महाराज.

महाराज : आज आम्हास वृत्तपत्राचे महत्त्व पटते आहे. हाच संदेश कल्याणकारी राज्य या नावाखाली व्हॉट्स्याप वरून पाठवा सगळीकडे. फेसबुकावर ही टाका सारे. कळू द्या जनतेस आमची पोटतिडिक. आमच्या पुरोगामी राज्यात अशा सगळया व्यवस्था असल्याच पाहिजेत. फक्त त्या आमच्या नियंत्रणाखाली असल्या की झाले. त्यात दिनांक सारखे एखादे नाठाळ वृत्तपत्र असले की.. त्यामुळे कुठे कुठे चूक

होऊ शकते ते कळते आपल्याला. त्यामुळे आम्ही सुधारणा करू शकतो.

प्रधानजी : जो हुकूम महाराज. आम्ही आपल्या डिजिटल खात्यास कामाला लावतो. आजच असे संदेश बनवून पाठवतो प्रजाजनांस. आपल्या सारखे महाराज असल्याचे महत्त्व त्यांस कळलेच पाहिजे महाराज. तूर्तास जन आंदोलनाबाबत काही निर्देश असल्यास.. महाराजांकडून याबाबत मार्गदर्शनाची आणि आदेशाची गरज आहे.

महाराज : या बाबतीत आपले काय म्हणणे आहे प्रधांजी?

प्रधानजी : महाराज, तिघे कैदखान्यात आहेत. न्याय मंत्री आपले म्हणणे मांडतीलच. जनक्षोभ हा या तिघांच्या कैदेमुळे झाला आहे.. तेव्हा आमचा विचार.. अभय असल्यास सांगतो महाराज आम्ही..

महाराज : आपणास नेहमीच अभय असते प्रधांजी..

प्रधानजी : आमचे म्हणणे असे की न्याय प्रक्रियेस लागणाऱ्या वेळेचा विचार करून त्या तिघांस सुरक्षा हमीवर सोडून द्यावे.. सुरक्षा हमी म्हणजे त्या तिघांकडून सर्व जनतेस सुरक्षा. त्यांच्यावर आमचे हेर नजर ठेऊन असतीलच. जनक्षोभ शांत झाला की पुढे आपण पुढील निर्णय घेऊ शकू. यात महाराज आपण

न्याय प्रेमी असल्याचे आपण जनतेत बिंबवू शकू. जनतेस आपण त्यांस अकारण कैद केल्याची भावना आहे त्यास ही उत्तर मिळेल. आणि त्या तिघांची सुटका ही न्याय प्रक्रियेचा एक भाग असे दाखवून देता येईल. आपल्याला कितीही विरोध झाला तरी न्याय प्रक्रियेत आपण काहीही हस्तक्षेप करत नसल्याचेही जनतेस दिसेलच. जनतेची स्मरणशक्ती ही अतिक्षीण असते.. त्यामुळे सारे विस्मरणात गेल्यावर त्या तिघांचा न्याय करता येईल. तोवर न्याय प्रक्रिया तिच्या वेगाने सुरू राहीलच.

महाराज : थांबावे प्रधांजी. आम्ही एक केळे खातो मग बोलतो.. (घडातून एक केळे सोलून खातात महाराज.. परत शिपाई साल गोळा करतो..) आता आम्ही बोलतो.. प्रधांजी, तुमची कल्पना उत्तम आहे. एका दगडात कित्येक पक्षी मारता येतील आम्हास. प्रधांजी, केळी न खाता ही समस्येवर उत्तर मिळू शकते?

प्रधानजी : क्षमा महाराज, आम्ही घरून निघतानाच अर्धा डझन खाऊन आलो आहोत.

महाराज : तरीच. आम्हाला पटले आहे ते रोज खा केळी नि समस्यांची करा होळी. आदेश काढा. पाठवून द्या त्या द्रोह्यांना घरी. वाटू देत मुक्त झाल्यासारखे. बाकी आपले हेरखाते आहेच.

प्रधानजी : आज्ञा हुजूर. आम्ही तातडीने ही कारवाई करतोच. आणि सगळ्या जनतेत आपल्या मोठेपणाचे संदेश पसरवण्याची व्यवस्थाही करतो. आमची एक दरख्वास्त होती महाराज..

महाराज : बोला प्रधांजी, देशाच्या कारभारासाठी आम्ही मागेपुढे पाहात नाही. बोला.

प्रधानजी : महाराज, आपल्या पदरी मागे चरणदास लीन कविराज होते..

महाराज : हुं.. आठवण नका काढू त्याची. कविता करता करता एक दिवस स्वतःचा अंत करून घेतला त्याने? आम्हाला आठवते, आम्ही त्याला देहदंड दिला होता. आमच्या पदरी कवींची फौज जमेतोवर धीर धरवला नाही त्यास. मृत्यूदंड देणे हा अधिकार आमचा, चरणदासाने तो स्वतःकडे घेतला. त्याच्या अंधार कोठडीत त्यास काय कमी होते? आणि एकदा तो देवाघरी गेला की प्रत्यक्ष सर्वशक्तिमान अशा आमचीही सत्ता चालत नाही त्याच्यावर.. हे त्याहूनही उद्विग्न करणारे..

प्रधानजी : होय महाराज. आम्ही क्षमा मागतो ती कटू आठवण काढल्याबद्दल. आमचे म्हणणे इतकेच.. आपण आपल्या पदरी अशी लेखनिकांची फौज ठेवावी जे आपणास आपल्या प्रतिमेबरहुकूम संदेश बनवून देतील. आपल्याला विरोध करणाऱ्याचे वस्त्रहरण करतील. अशी तैनाती पगारी

फौज पदरी असल्यास त्यांच्याकडून आम्ही सारे काही लिहून घेऊ.

महाराज : वा! प्रधांजी वा! कुठल्या झाडाची केळी खाता तुम्ही? ही कल्पना नामी आहे. तातडीने भरती करा. पण असे लेखनिक मिळणार कोठे?

प्रधानजी : त्याची चिंता नाही महाराज, कवी मिळणे कठीण पण गद्य माणसे भरपूर मिळतील महाराज. पैशाला पायलीभर. आम्ही आजच त्यांच्या मुलाखती घेतो. उद्यापर्यंत नेमणूक करून टाकतो. आणि आजचे संदेश आम्हीच लिहून काढतो.

महाराज : आपल्यावर आधीच कामाचा ताण आहे प्रधांजी..

प्रधानजी : पण महाराजांचे गुणगान गाणारे संदेश लिहिणे हा त्या ताणावरील उपाय आहे. आम्ही लिहितो.. आताच एक वाक्य सुचलेय.. न्यायाचा पुतळा, मेरू सद्गुणांचा.. मी आहे पाईक फक्त चक्रम महाराजांचा..

महाराज : वा! प्रधांजी लयभारी.

प्रधानजी : धन्यवाद महाराज. असे काही सुचत असते पण आपण म्हणता तसे वेळे अभावी लिहून होत नाही. मनातून उतरून कागदावर उमटण्यास आतुर असतात शब्द.. पण. पण

आता लेखनिक करतील काम. आम्ही प्रत्यक्ष लक्ष घालू त्यांच्या कामात. मार्गदर्शन ही करू त्यांस. आणि दणाणून टाकू आसमंत सारा.

महाराज : प्रधांजी, आम्ही तुमच्याहून जास्त केळी खाल्ली आहेत. आम्ही सांगतो तुम्हाला तसे करावे. आसमंत दणाणून न सोडता हळूहळू संदेशांतील जोर, जोम आणि जोश वाढवत ठेवावा. त्यात उगा स्तुतीचा वास येऊ न देता, सत्य असो वा कशीही पण आकडेवारी देणे महत्त्वाचे. वाचणारे सूज्ञ आहेत. त्यांच्यावर सोडून द्यावे सारे. दिवसात दहा संदेशातील आठ या पद्धतीने आणि दोन थेट स्तुतीपर असावेत. या प्रमाणात असणे महत्त्वाचे. उत्तम परिणामांसाठी परिमाण महत्त्वाचे.. प्रमाणास प्रणाम करा.. आम्ही वाचलाय असा काही संदेश.

प्रधानजी : आपण खोलवर विचार करता महाराज. आम्ही जातीने पाहू हे असे होईल असे. आपल्या प्रतिमावर्धनाचा हा प्रयोग आम्ही यशस्वी करूच महाराज.

महाराज : प्रधांजी, आम्हास आमच्या प्रतिमेबद्दल नाही तर आम्हास आमच्या राज्याबद्दल कळकळ आहे. आमच्या विरोधकांस त्याबद्दल मळमळ आहे. पण आमची बदनामी म्हणजे राज्याची बदनामी आणि आम्ही असलो तरच देश हा

सुरक्षित आहे. आम्हाला त्यासाठीच करावा लागेल हा सारा खटाटोप. त्यामुळे आमचे बळकट हात म्हणजेच मजबूत देश. आणि जे यास करतील विरोध ते राष्ट्रद्रोही.

प्रधानजी : महाराज, अशी विभागणी केल्यास सारेच सोपे होऊन जाईल.

महाराज : सारी या केळयांची कमाल प्रधांजी. आम्हास वाटते तुम्हाला कामे भरपूर आहेत. दरबार बरखास्त केल्यासच तुम्हाला समय मिळेल.

प्रधानजी : जशी आपली इच्छा महाराज. आम्ही सारे पार पाडतो. आपण चिंतन मनन करावे देशकाल, वर्तमान नि भविष्याबद्दल.

महाराज : ठीक. तर दरबार बरखास्त करा आता. आम्ही निघतो. एका समस्येचे समाधान झाल्याच्या समाधानात..

दरबारी : महाराजांचा विजय असो.

६

महाराज दरबारात येत आहेत..

सर्व दरबारी :

नमन नटवरा विस्मयकारा

तूच देशीचा तारणहारा

स्वामी तू पासष्ट कलांचा

राजा तू सकल जनांचा

सोडिशी तू हवेत गुबारा

नमन नटवरा विस्मयकारा

*महाराज येतात. आज अगदी समाधान विलसतेय चेहऱ्यावर. हाती मोबाईल. केळी नाहीत आज हातात. मोबाईलकडे एकटक पाहात येतात. खाली गालिच्च्यावर नजर ठेवून पडत नाहीत. सिंहासनावर बसतात.. खुदकन हसतात. मग मोठ्याने हसतात. मग सगळ्यांना मोबाईलवरचा निळा गुलाब दाखवत..*

शुभप्रभात.. गुड मॉर्निंग..

प्रधानजी : जी एम महाराज.. महाराज आज खुशीत आहेत. आम्ही त्यामुळे आनंदी आहोत. यथा राजा तथा प्रजा. महाराज खूश तर आम्ही खूश.

महाराज : छान प्रधांजी, छान. आम्ही खरेच खूश आहोत. समस्या निवारणाचा आनंद काही और. पाठवणी झाली त्या तीन विद्वानांची आणि आम्ही विसावलो. आता यापुढे काय करावे याचा बेत आम्ही आखला आहे. त्याआधी बाकी खबरबात सांगावी आम्हास.

प्रधानजी : आज्ञा हुजूर. त्या तिघांस निज धामास पोहोचवले आपल्या हुकुमानुसार..

महाराज : काय? आम्ही असा हुकूम..

प्रधानजी : निज धाम म्हणजे त्यांचे स्वतःचे घर महाराज. ते आता निज धामी निजले असतील. आम्ही स्वतः त्यानंतर आपल्या न्यायप्रियतेचे संदेश देशातील कानाकोपऱ्यात पसरवण्याची व्यवस्था केली. तीन नव्या लेखनिकांची नियुक्ती आम्ही काल रात्रीच केली महाराज. आपल्या सूचनेनुसार ते संदेश लेखनास तयार आहेत. आजपासून ते कामास सुरूवात

करतील. त्यांचा पहिला संदेश आतापर्यंत त्यांनी धाडला देखील असेल महाराज. आता चिंता नको.

महाराज : म्हणजे केळी खाणे नको आता? गजराजांची प्रकृती कशी आहे?

प्रधानजी : महाराज, त्यांच्या प्रकृतीस थोडा सुधार आहे म्हणतात राजवैद्य. आम्हाला वाटते बरोबरीने गुगलमावशीचा उपचार सुरू ठेवल्यास अधिकस्य अधिक फल मिळेल. पण राजवैद्य त्यास राजी नाहीत.

महाराज : आपले म्हणणे बरोबर आहे प्रधांजी, राजवैद्यांस आदेश द्या आमचा.. बरोबरीने दोन्ही उपचार सुरू ठेवा.

प्रधानजी : राजवैद्य म्हणतात ते उपाय त्यांच्या उपायाच्या विरूद्ध काम करतील. त्यामुळे तसे करू नये असे म्हणणे आहे त्यांचे.

महाराज : आता आम्ही क्रोधमग्न होत आहोत. मोबाईलवर लिहून आलेले ते उपचार काय उगीच? वैद्यराजांनी घेतले असेल वर्षानुवर्षे शिक्षण पण असे एक बटण दाबताच मिळणारे ज्ञान.. ते काय फुकाचे म्हणावे? तुम्ही लेखी आदेश द्या. दोन्ही उपचार बरोबरीनेच होणे गरजेचे. त्याशिवाय पर्याय नाही. (मोबाईल मधून वाचत) ज्ञानामुळे माणसास थोडा गर्व

चढतो. अधिक ज्ञानाने अधिक. अज्ञानी रहा. निगर्वी व्हा. शुभ दुपार. खरेय हे.

प्रधानजी : हुकूम हुजूर. आम्ही राजवैद्यांस आपला आदेश कळवतो.

*प्रधानजी मोबाईलवर संदेश पाठवतात. राजवैद्यांचा आदेश लिहून तातडीने अंमलबजावणीचा संदेश देतात.*

प्रधानजी : पाठवला आदेश आम्ही राजवैद्यांना. आपण म्हणता ते खरेच महाराज. गर्वाचा दर्प.. म्हणजे जणू सर्प.. ज्ञानास गर्वाचा दर्प आला की तो सर्पासारखा डसतो..

महाराज : वा! ल.भा. अगदी.

प्रधानजी : धन्यवाद महाराज. आताच सुचले आम्हाला. पाठवितो तो सगळीकडे. तर आता गजराज लवकरच सुधारतील.

महाराज : खरंय तुमचे. आता आम्ही सांगतो आमचा विचार.

प्रधानजी : आज्ञा करावी महाराज.

महाराज : आम्ही खूप विचार केला काल. केळी खात खात. आमच्या ध्यानी एक गोष्ट आली.. ते तिघे.. आमच्या सगळ्या या अवस्थेचे मूळ कारण.. त्यांनी विरोध केला म्हणून लोक

भडकले. मग आम्हाला त्यांना अटकेत ठेवावे लागले. त्यावरही लोकांनी निषेध नोंदवला. या सर्वांचा ताण सुव्यवस्थेवर किती आला असेल? वर सर्वांस संरक्षण द्यावे. जनतेस सांभाळावे. हे सारे मोफत होत नाही. तिजोरीतून द्रव्य द्यावे लागते आम्हास. कोण भरेल हा खर्च? आम्ही विचार केलाय.. ते तिघे.. ज्यांनी हा भुर्दंड पाडला तेच भरतील. विरोधाची ही किंमत भरावीच लागेल त्यांस. आताच्या आता त्यांच्याकडून वसूल करा. एक लक्ष सुवर्णमुद्रा. पाठवून द्या नोटिसा तत्काळ.

प्रधानजी : महाराज आपला निर्णय हा अत्यंत जालीम उपाय आहे. माणूस कणा ताठ ठेवील.. जोवर दोन वेळचे खायला मिळते आहे. एकदा पोट खपाटीस जाऊ लागले की सारा विरोध गळून पडेल. आणि वर आपल्या तिजोरीवरचा भारही होईल कमी. आम्ही त्वरित आदेश काढतो. आणि तिकडील महसूल अधिकाऱ्यांस धाडतो.

महाराज : थोडा विचार करतो आम्ही प्रधांजी, आदेश दोन दिवसांनी काढावा. थोडी परिस्थिती निवळू द्यावी की तडक वसुली करावी..

प्रधानजी : आपला हुकूम होईल तसे महाराज. आपणास वाटते तर काही दिवस जाऊ देऊ आम्ही. नंतर हा उपाय योजता येईल.

महाराज हाच उपाय सर्वसामान्य जनतेसाठी लागू करता येईल. एखाद्या घरी चोरी झाली, दरोडा पडला.. त्यासाठी करावयाचा तपास, तो तर मोफत नाही होत.. त्यासाठी उपकर लागू करावा. आणि चोरी करणारा पकडला गेला की त्याकडूनही सुरक्षा व्यवस्थेसाठी दंड वसुली करावी. राज्यात जनतेकडे चोरण्यासारखे काही नसते तर चोरी दरोडेच पडले नसते.. मग चोर नि दरोडेखोर ही नसते. मग आपला सुरक्षा खर्च वाचला असता. तेव्हा हा सुबत्ता सुरक्षा कर लागू करणे संयुक्तिक होईल महाराज. त्याव्यतिरिक्त अशी काही आगळीक केली कुणी, राजद्रोह आणि देशद्रोह, तर त्यांच्याकडून वसुलीचा खर्च तत्काळ वसूल करण्याचा कायदा लवकरच मंजूर करून घेता येईल महाराज.

महाराज : वेगळा कायदा! आम्ही म्हणू तोच कायदा.. प्रधांजी. आम्ही सार्वभौम आहोत..

प्रधानजी : खरेच महाराज, आपण सर्वशक्तिमान.. आपल्याला जी वेळ योग्य वाटेल तेव्हा पाठवू आदेश आम्ही..

महाराज (मोबाईल मधून वाचत) : वेळ जायला वेळ लागत नाही पण प्रत्येक गोष्टीची वेळ यावी लागते. शुभ संध्याकाळ. आम्ही हे आताच शिकलो. समय, वेळ, काळ हे शब्द समानार्थी

नाहीत. त्यांना त्यांचा वेगवेगळा अर्थ आहे. आम्हास वाटते आता वेळ झाली पुढील कारभाराची.

प्रधानजी : हु. हु.

महाराज : म्हणजे काय प्रधांजी?

प्रधानजी : हु हु म्हणजे हुकूम हुजूर.. व्हॉट्स्यापी भाषेत असे ल.रू.

महाराज : लरू?

प्रधानजी : ल.रू. म्हणजे लघुरूप.. ते वापरायची सवय झाली आम्हास महाराज.

महाराज : ल.भा. प्रधांजी. बोलावे. राज्याची हालहवाल..

प्रधानजी : उत्तम. अति उत्तम. राज्यात सारे क्षेम कुशल आणि मंगल. ते तात्पुरते तोतयाचे बंड मोडून काढल्याने शांतता नांदते आहे.

महाराज : आम्हास वाटते ते चहाच्या पेल्यातील वादळच होते जणू. त्या कपातलाच चहा पिऊन.. नाही केळी खाऊन आम्ही शमवले ते. उत्तम. आता या उपर अशी परिस्थिती उद्भवू नये म्हणून प्रयत्न करावे लागतील. आम्ही त्याचाच विचार करीत आहोत.

प्रधानजी : आपण काळाच्या पुढचा विचार करता महाराज. आपण द्रष्टे आहात. त्यामुळेच हे राज्य सुखी आहे महाराज.

महाराज : खरेच. आम्ही गेले दोन दिन विचार करत आहोत असा.. परिस्थिती उद्भवण्याआधीच तिचा बंदोबस्त करणे महत्त्वाचे. (मोबाईल मधून वाचत) जंगलात आग लागण्या आधीच ती विझवण्याची व्यवस्था करतो तो खरा दुष्ट. तोच जंगलचा राजा म्हणवला जातो. शुभ मध्यरात्री. आम्ही म्हणूनच राजे आहोत या जंगलाचे. आमचे आहे हे जंगलराज.

प्रधानजी : खरे आहे महाराज. द्रष्टेपणाबद्दलचे.

*एक शिपाई धावत येतो. प्रधानजींच्या कानी बातमी सांगतो. प्रधानजींचा चेहरा बदलत बदलत चिंताग्रस्त होतो. महाराजांच्या शब्दात चिंतामग्न..*

महाराज : काय खबर आहे प्रधांजी?

प्रधानजी : त्या तिघांची सुटका केली आपण..

महाराज : ते पळून गेले?

प्रधानजी : नाही महाराज, आपले गुप्तचर असताना असे कसे होईल?

महाराज : त्यांनी आत्महत्या..

प्रधानजी : नाही महाराज..

महाराज : मग चिंतेची बाब कोणती?

प्रधानजी : जनता परत आंदोलनाला सज्ज होत आहे. जनतेच्या मनात काय आहे ते कळत नाही. पण परत निषेधाची भाषा सुरू होत आहे. आपले हेर अधिक माहिती गोळा करीत आहेतच.

महाराज : हे त्या तिघांचे कृत्य?

प्रधानजी : तसा पुरावा नाही सापडला अजून महाराज. पण त्यांचेच असावे. पुरावा मिळाला की त्यांस परत ताब्यात घेता येईल.

महाराज : शिपाई, केळी आणावीत समोर आमच्या. तोच एक उपाय आहे समस्येवर.

*महाराज केळी खाऊ लागतात. शिपाई पिकदाणी सारखे भांडे पुढे करत साले गोळा करतो. दरबारी आपापल्या मोबाईल मध्ये डोके घालून बसतात..*

महाराज : प्रधांजी, आम्हास उपाय सापडला. विज्ञान आणि तंत्रज्ञान.. हाच सगळ्यांवर उपाय..

प्रधानजी : म्हणजे काय महाराज?

महाराज : प्रधांजी..

प्रधानजी : हु. हु. महाराज.

महाराज : आमच्या ध्यानात आलेली बाब ती ही.. ह्या मोबाईलमधून क्षणार्धात संदेशवहन होते. एक दुसऱ्यास दुसरा तिसऱ्यास.. अशी साखळी तयार होते, त्यात मूळ संदेश कोणी धाडला याचा पत्ता लागत नाही..

प्रधानजी : सत्य आहे महाराज.

महाराज : तेव्हा आपल्या विज्ञान विभागात हुकूम द्या. एकूण एक म्हणजे सारेच मोबाईल संदेश कुठून उगम पावतात हे शोधा. ऋषिचे कूळ नि नदीचे मूळ नसेल सापडत पण मोबाईल संदेशांचे मूळ मात्र नक्कीच सापडू शकते. लावा कामास वैज्ञानिकांस नि तंत्रज्ञांस. आमची खात्री आहे हे सारे त्या संदेशांतूनच घडवून आणले जात आहे. आणि त्यापाठी त्याच तीन द्रोह्यांचा हात असणार. एकदा पुरावा मिळाला की आम्ही पुढील कारवाई करूच..

प्रधानजी : हु.हु.

*प्रधानजी मोबाईलवर संदेश लिहितात. तोवर महाराज आपल्या मोबाईलवर काही वाचत बसतात. हसू येते ते दाबून गंभीरपणे बसून राहतात.*

प्रधानजी : दिला आदेश महाराज. आम्ही माहिती मिळताच आपल्याला पाठवतो ती.

महाराज : आम्हाला खात्री आहे, सगळ्या प्रश्नांची उत्तरे विज्ञानातच आहेत. विज्ञानाधारित समाज हे आमचे स्वप्न आहे. पिढ्यानपिढ्या आमचे विज्ञान चालत आले आहे. त्यावर आधारित सारे काही आहे. आमच्या सगळ्या प्रथा अन रीतिरिवाजांस वैज्ञानिक आधार आहे. आम्हीच तो आमच्या पुढील पिढ्यांस सांगितला पाहिजे. नव्या तंत्रज्ञानातून त्या सगळ्याचा प्रसार केला पाहिजे.

प्रधानजी : आपण द्रष्टे आहात महाराज. आम्ही हे तातडीने करवून घेऊ.

महाराज : आमच्या पाठची केळी काही सुटत नाहीत. तरी बरे केळी खाऊन समस्या सुटतात हा शास्त्रीय संदेश पोहोचला आमच्या पर्यंत, नाहीतर मुश्किल झाले असते. विज्ञान, शास्त्र.. यातच सगळ्या समस्यांची उत्तरे आहेत.. त्यावरच आम्ही प्रगती साधू..

प्रधानजी : क्षमा महाराज, साधू म्हणालात आपण त्यावरून आठवले. साधू श्रीपाद लवकरच आपल्या राज्यात आशीर्वाद देण्यास येत आहेत. खरेतर हीच आनंदवार्ता आपणास प्रथम द्यावयाची पण राहून गेली ती. क्षमा असावी.

महाराज : वा! फारच छान. साधूंचे दर्शन घेतले की समस्या आपोआप दूर होतील. फक्त यज्ञयागासाठी पाचपन्नास बोकडांची तयारी करा. राज्यात ज्या ज्या शेतकऱ्यांकडे असतील त्यांचे बोकड बळी देण्यासाठी ताब्यात घ्या. जपजाप्यासाठी साऱ्या सुविधा उपलब्ध करून द्या. आपल्या विज्ञानाधिष्ठित राज्यात त्यांच्यासाठी काही कमी पडू देऊ नका. लक्षात ठेवा अशा साधुपुरूषांच्या आशीर्वादानेच राज्य मोठे होत असते. त्यात साधू श्रीपाद तंत्रमंत्रात माहिर. त्यांचा महिमा मोठा. पण त्यांचा क्रोधही तितकाच मोठा. तेव्हा आपणास सावधान राहणे आवश्यक आहे. त्यांना शंभर गुंठे जमीन द्या. काही शेतकऱ्यांकडून काढून घ्या. काही नदीपात्र बुजवून तयार करा. पण साधुपुरूषाचे चरण आपल्या राज्यास लागलेच पाहिजेत. आपली पवित्र भूमी मग फक्त देशभक्तच निर्माण करेल. आमच्यासारखे ज्वलंत. देशभक्ती म्हणजे आम्ही म्हणू ती. मग आमच्या विरूद्ध विचार करणारी सारी देशद्रोही.. प्रधांजी.. हे आम्हास काय झाले आहे? आमच्या डोक्यातून ते तिघे जातच नाहीत. फिरून फिरून परत तेच

येतात मनात. असू देत. आता साधू श्रीपाद येतील आणि केळी न खाता समस्या निवारण होईल. आम्ही शिणलो आहोत प्रधांजी. केळी खाऊनही. दरबार बरखास्त करावा काय?

प्रधानजी : हु.हु. आपण विश्राम करावा. बाकी आम्ही पाहतोच. लेखनिक कामास लागले आहेतच. साधू श्रीपादांचा महिमा सगळीकडे पसरवतोच आम्ही. आणि वैज्ञानिकांनी संदेशांबद्दल आणलेली माहितीही पोहोचवतो आपल्यापर्यंत..

महाराज : दरबार बरखास्त.

सारे दरबारी : महाराजांचा विजय असो.

७

महाराज दरबारात येत आहेत..

सर्व दरबारी :

नमन नटवरा विस्मयकारा

तूच देशीचा तारणहारा

तू जनतेचा एकच रक्षक

तूच एक तो जनप्रिय शासक

चापलुसां न देशी थारा

नमन नटवरा विस्मयकारा

*महाराज येतात नेहमीप्रमाणे मोबाईल मध्ये डोके घालून. सवयीने गालिच्यावर पडणे चुकवतात. आज केळ्यांचा घड गळ्यात घालूनच येतात. चेहऱ्यावर ताणतणावाचे भाव आहेत. कालच्या जन असंतोष*

किती वाढला असेल कुणास ठाऊक. प्रधानजी आणि सुरक्षा मंत्री बघून घेतात पण शेवटी केळी तर महाराजांनाच खावी लागतात. महाराज विचार करून थकले आहेत. त्यात परत रात्रभर तो मोबाईल नि त्यावर संदेश वाचन नि लेखन. महाराज इतके कंटाळलेलेत की विनोदास पण हसत नाहीत तो वाचून. ही तीन देशद्रोह्यांची ब्याद कशी टळेल.. मनात आणले तर महाराजांना अशक्य ते काय. पण ते जनमत. काही नाहीतर त्याची थोडीशी दखल घ्यावीच लागते. किंवा घेतल्यासारखे दाखवावे तरी लागते. महाराजांना हे आवडत नाही खरेतर. राजा कसा सार्वभौम हवा. उगाच जनतेची इच्छा नि जनमत असली खुळं महाराजांना आवडत नाहीत, पण सांगणार कुणाला. राजेपदाचा मुकूट कसा छान छान असावा, त्यात असले काटे कशाला? गेल्या काही वर्षांपर्यंत महाराजांना असले काही प्रश्न भेडसावतच नव्हते. पण आता वृत्तपत्रे आली. मोबाईल आले. लोक व्यक्त होतात नि इतरांनाही समजवतात.. लोक व्यक्त होतात.. इतरांना समजवतात.. आमचे लेखनिक तेच करतात.. इथेच आहे किंवा असणार प्रश्नाचे उत्तर..

महाराज मोबाईलकडे पाहात विचार करताहेत.. दरबारी बसून आहेत. विचार करत.. गेले काही दिवस वातावरण तंग आहे. मागे शेजारच्या गोंडावनाच्या राजाने आक्रमण केले तेव्हाही असे तंग वातावरण नव्हते. आतील शत्रू जास्त भारी पडतो की काय? असणारच. पण महाराज साऱ्यांना पुरून उरतीलच.. कित्येक दिवसांत ते गमतीजमतीचे वातावरण नाही..

प्रधानजी : शुभप्रभात महाराज..

महाराज (दचकत) : शुभप्रभात. खरेच शुभ आहे की नुसती बोलण्यापुरती?

प्रधानजी : नाही महाराज. आम्ही सारे काही तयार केले आहे इकडे. साधू श्रीपादांच्या आगमनाची सारी तयारी झाली आहे. नदीपात्र बुजवून सपाट केले आहे. तिकडील जनता आपण त्या तिघांना केलेल्या शिक्षेनंतर तोंड उघडणार नाहीत महाराज. दिनांकच्या संपादकांस आम्ही एक कायदेशीर नोटिस धाडून दिली आहे. त्या जंजाळातून ते मोकळे होईतोपर्यंन्त साधुंचा येथील मुक्काम हलला असेल.

महाराज : छान. या दिनांकवाल्यास अजून थोडे धडे शिकवा प्रधांजी.

प्रधानजी : हु.हु.

महाराज : अजून काही खबरबात?

प्रधानजी : गजराजांची प्रकृती बिघडल्याचा राजवैद्यांनी सांगावा धाडला आहे आणि अजून एक वाईट बातमी आहे महाराज..

महाराज : बोला, सरावलो आहोत आम्ही वाईट बातम्यांस. बोला.

प्रधानजी : आपल्या सक्त आदेशानंतर राजवैद्यांनी सेवेतून मुक्तीसाठी पत्र धाडले आहे. त्यांच्या मते आता महाराज आणि इतरांस त्यांच्या सेवेची जरूरी नाही.

महाराज : गर्व! ज्ञानाचा गर्व. त्यांच्याकडूनही राजरत्न सुधरणार नाही.. आमच्या पिताजींच्या काळापासून वैद्यराज आमच्या सेवेत आहेत. आजवर असा प्रसंग कधी आला नाही. त्यांच्या ज्ञानाबद्दल आदर ठेवून म्हणतो आम्ही, याच्या आगमनानंतर आम्हांसही माहिती आहे ते विज्ञान. असो. त्यांना मोकळे करा. फक्त राजरत्नांच्या इलाजानंतर.

प्रधानजी : नाही महाराज, आम्ही सांगितले तसे तर त्यांचे म्हणणे असे की, त्यांच्या ज्ञानानुसार होणार असेल तरच इलाज करतील ते. आपल्या आदेशाचे उल्लंघन न करता ते आपल्या चाकरीचा राजीनामा देणे पत्करतील.

महाराज : जाऊ द्यावे त्यांना. आमचे ग्रह फिरले असे वाटते आम्हास.. नाही, साधू श्रीपादांच्या पदस्पर्शाने आम्ही तरून जाऊ. आपल्या लेखनिकांबद्दल काही?

प्रधानजी : महाराज, ते लेखनिकांचे काम उत्तम सुरू आहे. गेल्या वर्षभरात आपल्या राज्याची प्रगती मांडणारे कोष्टक बनविले त्यांनी, विश्वास बसत नाही आपण इतके कार्य केले असेल म्हणून! एक एक आकडेवारी डोळे दिपवते महाराज.

लेखनिकांची कमाल ही की अवघ्या पंधरा मिनिटांत त्यांनी हा संदेश लिहून काढला, आकडेवारी सकट! उगाच गणिती आकडेमोडीसाठी डोकेफोड नको म्हणे.

महाराज : ल.भा.

प्रधानजी : त्यातील एक तर कवी आहे महाराज. आपल्या कविकल्पना पूर्ण करण्यास याहून मोठी संधी कशी मिळणार म्हणाला तो.

महाराज : छान. असे धडाडीचे असतील पदरी तर राज्य प्रगतीपथावरच जाणार नेहमी प्रधांजी. ल.भा.  आणि ते जनक्षोभाबद्दल काही?

प्रधानजी : महाराज, दुर्दैवाने अजून त्यास उतार नाही. कररचना बदलल्यावाचून ते शमणार नाही असे गुप्तचरांचे म्हणणे आहे.

महाराज : नाही. जनेच्छेपुढे नमणारे नामधारी राजे आम्ही नाही. हा विरोध ठेचून काढू आम्ही. आम्ही सार्वभौम, सर्वसत्ताधीश. काल पर्यंत आम्हास मानणारी जनता त्या दीड दमडी तिघांच्या नादी कशी लागू शकते..

प्रधानजी : सत्य आहे महाराज. त्या मोबाईलच्या जोरावर यांनी डाव साधला आहे.

महाराज : प्रधांजी, आम्ही याचा मुळापासून विचार केला आहे. ज्या तंत्रज्ञानाने आव्हान उभे केले आहे त्याच तंत्रज्ञानात आपणास उत्तर मिळण्याची शक्यता आहे.

प्रधानजी : होय महाराज..

*शिपाई आत येऊन प्रधानजींस एक मोठा कागद गुंडाळलेला संदेश देतो. प्रधानजी उघडून पाहतात..*

प्रधानजी : आता महाराज त्या वैज्ञानिक संदेश मूळ शोधाबद्दल.. आपल्या तंत्रज्ञांनी वेगवेगळया मोबाईल संदेशांचे मूळ शोधून काढले आहे. त्यांनी ही मिळवलेली माहिती पाठवली आहे..

महाराज : बोला.

प्रधानजी : आम्ही त्यांनी संकलित केलेली माहिती वाचून दाखवतो महाराज. त्यांनी म्हटले आहे की आता काही थोड्या संदेशाची माहिती मिळाली आहे, पण जसजसे त्यांचे तंत्र प्रगत होईल तस तसे संदेश येताच त्याचे मूळ समजून येऊ शकेल त्यांना. एकूण राज्य सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे हे महाराज.

महाराज : खरेय प्रधांजी. वाचा. संदेशांचे मूळ काय ते..

प्रधानजी : हु. हु. पहिलाच संदेश केळयांबद्दल आहे. खावी केळी आणि समस्यांची करा होळी हा संदेश.. हिंगणपूरच्या समस्त हिंगणपूर पंचक्रोशी केळी उत्पादक संघाकडून पाठवण्यात आला आहे. केळयांचे उत्पादन विक्रमी झाल्याने त्याचा उठाव होण्याकरिता शास्त्रीय भाषेत संदेश पाठवून केळयांची महती पटवावी असा त्यामागील संदेशच त्यांच्या हाती पडला आहे. समस्या निवारण करतील वा तसा विचार करण्यास मदत करतील असले कोणतीही रासायनिक पदार्थ केळयांत नसून केळी व समस्या यांचा संबंध नाही. पण आता जनमानसात हे भिनल्याने केळयांचा खप वाढला आहे असे त्यांना पाहणीत दिसले.

महाराज : म्हणजे आम्ही खाल्लेली केळी वाया गेली?

प्रधानजी : नाही महाराज, समस्यापूर्ती आपण केलीच, ती स्वबळावर. त्यात केळयांचा वाटा नाही इतकेच. दुसरे संदेश ज्यांचा माग घेतला गेला आहे त्यात कित्येक शुभप्रभातीची फुले कुठून उगवलेली आहेत हे सांगण्यात आले आहे..

महाराज : ते सारे सोडा प्रधांजी, आम्हास त्या तिघांच्या संदेशाबद्दल अधिक माहिती हवी आहे.

प्रधानजी : होय महाराज.. आम्ही पाहतो..

*प्रधानजी पाने उलटत राहतात. मग एका पानावर त्यांना त्याबद्दल माहिती मिळते. ती ते आधी वाचून घेतात. मग बोलू लागतात..*

प्रधानजी : महाराज, आपला संशय खरा ठरला. गेल्या काही दिवसात जनतेला मिळालेले संदेश त्याच तिघांच्याकडून गेलेले आहेत. त्या संदेशांनीच नव्याने जन आंदोलन उभे राहिले आहे. लोकांची माथी भडकवण्याचे कृत्य या तिघांचेच आहे महाराज.

महाराज : वाटलेच होते आम्हास ते. अजून काही म्हणतो तो अहवाल?

प्रधानजी : गेल्या काही दिवसांत, म्हणजे आपण कैदेतून सुटका केल्या केल्या ते कामाला लागले आहेत महाराज. त्यांनी इकडून निघताच हे सारे उद्योग सुरू केले परत.

महाराज : आम्हास तो संशय होताच प्रधांजी.

प्रधानजी : आता महाराज त्या तिघांस परत कैदेत टाकण्याचे हुकूम काढतो आम्ही. आता परत त्यांना सोडवणे नाही. चरणदासाची अंधारकोठडी रिकामीच आहे. त्यात तिघांना कोंबू आणि कोंडू. तिथे प्रकाशाचा एक किरणही पोहोचत

नाही.. आणि तिथून त्यांचा कुठलाही विचार बाहेर पोहोचणार नाही. काही दिवसांतच लोक विसरून जातील आणि पुन्हा राज्य सुरळीत चालू राहिल. सारेच दरबारी त्या दिवसाची वाट पाहात आहेत महाराज.

महाराज : खरे आहे तुमचे. पण आम्ही विचार करीत आहोत. आम्ही केळी खाऊन विचार करू. भलेही त्यास कुठला रासायनिक आधार नसो.. शिपाई केळी..

*महाराज शांतपणे केळी सोलून खाऊ लागतात. प्रधानजी मोबाईल कडे पाहात बसतात. शिपाई सालं गोळा करायला भांडे पुढे करतो. थोड्या वेळात..*

महाराज : प्रधांजी, साधूजी कधी पोहोचताहेत?

प्रधानजी : आजच महाराज. सारी जय्यत तयारी आहे. हवनकुंडासाठी जवळील जंगलात दोन दिवस रात्र जंगलतोड केली महाराज.. दिनांकमध्ये त्यावरही टिप्पणी आली आहे.. साधू श्रीपादांचे चरणकमल कधीही इथे पडतील महाराज.

महाराज : छान. आम्हाला यात आमच्या सगळया समस्यांचे समाधान दिसते. आम्ही म्हणालो होतो तसे.. साधू आले की आम्हास

आमच्या सगळ्या समस्यांवर उपाय मिळतात. त्या देशद्रोही तिकडीस आता पकडू नका. नीट नजर ठेवा. आम्ही लवकरच ठरवतो काय करावे ते. आणि या अहवालाची वाच्यता कुठेही होऊ देऊ नका.

प्रधानजी : हु. हु. आम्ही पुढील हुकुमाची वाट पाहू महाराज. इतक्या अक्षम्य अपराधानंतरही आपण असा आदेश देत आहात, तेव्हा त्यात आपला नक्कीच काहीतरी विचार असणार. आपल्यासारखा विचार आम्ही तर नाही करू शकत.

महाराज : ठीक तर, आपण साधुंच्या आगमनाच्या तयारीस लागावे. आम्ही महालात त्यांच्या आगमनाची प्रतीक्षा करतो. दरबार बरखास्त.

प्रधानजी : हु. हु.

दरबारी : महाराजांचा विजय असो.

८

महाराज दरबारात येत आहेत..

सर्व दरबारी :

नमन नटवरा विस्मयकारा
तूच देशीचा तारणहारा

बोटांवरी असा खेळविशी
उसंत कुणाही जरा न देशी
फुटती त्यां घामाच्या धारा
नमन नटवरा विस्मयकारा

*महाराज येतात. आज मोबाईल खिशात आहे. केळी नाहीत. चालण्यात एक आत्मविश्वास आहे. टांगा टाकत महाराज येतात नि आपल्या सिंहासनावर बसतात. आजूबाजूस नजर टाकत..*

महाराज : सुप्रभात. दरबारी जनांस शुभ सकाळ. प्रधांजी, सुप्रभात. गुड मॉर्निंग.

प्रधानजी : गुड मॉर्निंग महाराज.

महाराज : साधू जन येती घरा तोचि दिवाळी दसरा प्रधांजी. साधू श्रीपाद काल आले नि त्यांनी सकल समस्यापूर्ती करून टाकली. आज आम्ही अगदीच विश्वासाने.. आत्मविश्वासाने सांगतो आहोत.. आम्ही अत्यंत आनंदमग्न आहोत आज.. ते चहाच्या पेल्यातील वादळ चहासारखेच पचवून ढेकर देणार आम्ही.. अगदी त्यात पार्ले जी बुडवून! आम्ही यशस्वी होणार.. आम्हीच यशस्वी होणार.. आम्ही यशस्वीच होणार.. आणि आम्ही यशस्वी होणारच! श्रीपाद स्वामींचा आशीर्वाद फळणार आणि आमचे राज्य फळफळणार! राष्ट्रद्रोही पापी तळमळणार.. जनतेचे डोळे आता उघडणार.. आम्ही उघडणार..

प्रधानजी : नक्कीच महाराज. महाराज तुम्ही आहात तर सारे काही शक्य आहे. नाही.. तुम्ही आहात तरच सारे काही शक्य आहे. त्या जनद्वेषी राष्ट्रद्रोहींचा बंदोबस्त दृष्टिपथात आलेला दिसतो आहे महाराजांना..

महाराज : प्रधांजी, ते तर आहेच. त्या आधी नवीन काही खबरबात?

प्रधानजी : महाराज, आपल्या या नगरीत साधुजींचे पवित्र चरणकमल काल अवतरले. त्यांची चरणधूळ माथी लावून आम्ही कामास लागलो. पण राजरत्न.. ते गजराज त्या आधीच निजधामास गेले निघून. थोरल्या महाराजांच्या काळातील गजराज काळाच्या पडद्याआड गेले. अत्यंत दु:खद बातमी आहे महाराज.

महाराज : क्लेषमग्न आहोत आम्ही. अत्यंत क्लेषमग्न..

प्रधानजी : गजराज गेले पण आपले राजवैद्य संतापून आम्हास चार शब्द सुनावून गेले महाराज. त्यांच्या म्हणण्यानुसार फक्त चुकीच्या उपचारांनी बळी घेतला गजराजांचा. आम्ही वाद घातला नाही महाराज, जे आपल्या पदरी नोकरीत नाहीत त्यांच्याशी बोलण्याचे आम्हाला तरी प्रयोजन वाटले नाही महाराज.

महाराज : खरंय. आम्ही आलो तेव्हा अत्यंत खूश होतो.. पण ही पहिलीच खबर.. असो. घडणारे घडतेच. ते टाळता येत नाही. प्रत्येक प्राणीमात्राची जीवनरेखा आखून दिली आहे, बाकी सारे निमित्तमात्र. वैद्यांना वाटते त्यांच्या उपचाराने कोणी बरा होतो.. अहंकार फक्त त्यांचा. अहंकार. बाकी घडणारे ना टळू शकते. साधू म्हणतात तेच खरे. दैवगती पुढे

प्रत्यक्ष आम्हासही शरण जावे लागत असेल तर इतरांची काय कथा? असो. अजून काही राज्यकारभार?

प्रधानजी : एक विशेष परवानगी हवी होती महाराज..

महाराज : बोलावे..

प्रधानजी : गजराजांच्या पायी तुडवण्याची शिक्षा दिले गेलेले ते शिपाई.. त्यांच्याबद्दल निर्देश द्यावा महाराज..

महाराज : तुम्हास काय वाटते प्रधांजी?

प्रधानजी : आम्हास वाटते तीन पर्याय आहेत.. गजराजच नसल्याने त्यांना सोडून द्यावे, किंवा आपल्या आज्ञेनुसार आयुष्यभर तुरूगात ठेवावे किंवा इतर कोणत्याही हत्तीच्या पायी द्यावे..

महाराज : छान ! अगदी खोलवर विचार केला आहेत तुम्ही. आज आम्हास साधूंच्या आगमनाने सारे गुरूजन आठवत आहेत. त्यांना स्मरून आम्ही यास गणिती उपाय योजू इच्छितो.. आमच्या गणिताच्या गुरूस स्मरून.. तीन पैकी एक हिस्सा.. चिठ्ठ्या टाकाव्यात तिन्ही पर्यायांच्या. पैकी एक निवडावी. त्या शिपायांच्या भाग्यरेषेवर जे लिहिले असेल ते होईल वा होईलच.

प्रधानजी : हु. हु. आम्ही हे करूच. आपल्या शास्त्रीय संशोधकांनी अन्यही काही संदेशांचा माग काढला आहे महाराज. आज्ञा असल्यास..

महाराज : प्रधांजी, आता ते नको आम्हास. आमचे उद्दिष्ट साध्य झाले. त्या वैज्ञानिकांस सुरू ठेवू द्यात संशोधन. नाहीतर दुसरे काम द्या त्यांस.

प्रधानजी : हु. हु. जनतेच्या आंदोलनास अजून उतार पडताना दिसत नाही महाराज. जनता अजूनही क्रोधित आहे. विशेषतः आपल्या राज्याच्या उत्तर भागात. त्यांनी अजूनतरी शांततापूर्ण निषेध केला आहे, पण तो शमण्याची लक्षणे नाहीत. त्या तिघांचा जनतेवर विलक्षण प्रभाव आहे असे गुप्तचर अहवाल सांगतो.

महाराज : या सगळ्यावर उपाय आता आमच्या हाती आहे. त्याव्यतिरिक्त काही असल्यास सांगा.

प्रधानजी : नाही महाराज, आमच्या ध्यानी मनी स्वप्नी तेच आहे. जनतेस कुणी कसे चुकीच्या रस्त्यावर चालायला भाग पाडू शकते ते पाहतो आहोत आम्ही.

महाराज : प्रधांजी, व्यथित होऊ नका. आम्हास साधू श्रीपादांचा आशीर्वाद आहे. आमच्याकडेच या प्रश्नावर उत्तर आहे.

गुरूकिल्ली म्हणा. अजून काही कामकाज नसेल तर आम्ही दरबारास सांगतो यावरील रामबाण उपाय.

प्रधानजी : महाराज, हेच महत्त्वाचे कामकाज. आपल्या उपायांस ऐकण्यास आम्ही सारेच आतुर आहोत. आम्हाला वाटले होते की आपण त्या तिघांस परत कैदेत टाकण्याची आज्ञा द्याल, पण नाही. महाराजांनी आणखी वेगळे काही ठरवलेले दिसते आहे.

महाराज : अर्थात. आम्ही उपाय शोधला आहेच. आम्ही खोलात जाऊन विश्लेषण केले समस्येचे, त्यात आम्हास काय जाणवले? तर ते असे.. काळ बदलत चाललाय. कालचा काळ वेगळा होता. आमच्या पिताजींच्या काळी असे संपर्क तंत्रज्ञान नव्हते. आता संपर्कक्रांती झाली आहे. आम्ही आमच्या प्रगतीशील राज्यात तिला मोकळया मनाने बोलावलेय. आता आपल्या विचारांची देवाणघेवाण एका मोबाईलच्या बटनावर होऊ शकते. आपला विचार एकाकडून दुसऱ्याकडे तत्काळ पाठवता येतो. आपले आग्रही मत कोठेही मांडता येते. कोणाची इच्छा असो वा नसो त्यास धाडून तो वाचेल असे पाहता येते. आम्ही हे सारे आमच्या राज्यात करविले. का? कारण प्रगत राज्यातील ही महत्त्वाची गोष्ट आहे. राज्याच्या प्रगतीचा अहवाल आता

घराघरात पोहोचवू शकू आम्ही. राज्याची नि राष्ट्रप्रेमाची मोहिनी प्रजेवर टिकवायची तर हे केलेच पाहिजे. आणि त्यात त्यांचेच भले आहे. राज्याचे भले आहे. आमच्या एक लक्षात आले, मोबाईल आणि त्यावरील संदेश यांचा जबरदस्त प्रभाव जनतेवर आहे. कोणतीही माहिती क्षणार्धात एका टोकावरून दुसऱ्या टोकापर्यंत नेतो तो मोबाईल. अशी माहितीची देवाणघेवाण कोणीही कुठेही कशीही करू शकतो. क्रांती घडवली ती आम्ही. त्या क्रांतीची फळे जनतेस मिळाली. जनता खूश झाली आमच्यावर. आम्हीही त्या मोबाईलच्या प्रेमात आहोत. त्याने आम्हाला आमच्या प्रशासनास गती दिली, ज्ञान दिले, माहिती दिली आणि विरंगुळाही दिला. ज्याच्या जोरावर आम्ही राज्यात संदेशवहनाची क्रांती घडवली, त्याच्याच जोरावर आता तीच माहिती आमच्यावर उलटू पाहतेय. आम्ही जी गोष्ट सर्वांच्या हाती दिली, तिचाच गैरवापर करताहेत आता. आमच्यावरच उलटवू पाहताहेत. पण यांच्या त्या कुटिल चाली आम्ही यशस्वी होऊ देणार नाही. मोबाईल आणि संपर्क क्रांती.. दंतमजनाच्या पेस्ट सारखी आहे. एकदा बाहेर आली की आत नाही घालू शकत. एकदा पाठवलेला लघुसंदेश, आणि इमेल परत बोलावता येत नाही.. पूर्वी धनुष्यातून सुटलेला बाण येत नसे तसा.. तर मोबाईल

तंत्रज्ञान आता परत नाही फिरणार.. पण त्याच मोबाईलच्या साह्याने आम्ही मात करू त्यांच्यावर. तेही त्यांच्या नकळत.

प्रधानजी : म्हणजे काय महाराज?

महाराज : ज्या गावच्या बोरी त्याच गावच्या बाभळी. जशास तसे. आणि ठकास महाठक!

प्रधानजी : म्हणजे महाराज? आपल्यासारख्या सर्वशक्तिमान राजास कोण शह देतोय की आपणास असे करावे लागतेय? आम्हाला तर वाटतेय की मुसक्या आवळून तिघांना अंधारकोठडीत डांबून ठेवावे. आणि सगळ्यांसमोर असे चित्र उभे करावे की कुणाची परत अशी हिंमत होऊ नये.

महाराज : प्रधांजी, सारे बळाच्या जोरावर नाही होत. झाले तरी त्याचा योग्य तो परिणाम नाही होत. आम्ही याबाबतीत सारासार विचार केला आहे. ज्या मोबाईलच्या जिवावर उड्या मारत आहेत ते त्याच मोबाईलच्या जोरावर आम्ही चीत करणार आहोत त्यांना. डाव असा खेळावा की त्यांच्या ध्यानातही न यावे ते चीतपट झाल्याचे. प्रधांजी, आपल्या लेखनिकांस आज्ञा करा..

प्रधानजी : हु. हु.

महाराज : लेखनिकांस सांगा मिनिटास एक या वेगाने संदेश धाडा सगळीकडे.. त्यात ते तिघे हे केंद्रस्थानी. सारी कल्पनाशक्ती वापरून संदेश तयार करा. लेखनिकांस सांगावा धाडा, आम्ही स्वतः त्यांना समजावून सांगतो संदेश कसे लिहावेत नि त्यात काय लिहावे. ते तिघे कर चुकवून देशाचे नुकसान करीत आहेत, गेल्या कित्येक वर्षांपासून कर भरलेला नाही त्यांनी.. आणि इतर सामान्य जनतेच्या पैशांतून आपले फायदे उकळताहेत सारे.. आकडेवारी बनवा सारी. त्यांचा करास विरोध स्वार्थापोटी आहे हे कळू द्या सर्वांस, पण त्यापुढे जाऊन सर्वसामान्य जनतेचे त्यात कसे नुकसान आहे ते लिहा. किंबहुना त्या जनतेसच लुबाडण्यासाठी हा कर विरोध आरंभला आहे या तिघांनी हे बिंबवा. त्या तिघांच्या गडगंज मालमत्तांचा तपशील द्या.

प्रधानजी : पण हे सारे तपशील? कुठून आणि कसे?

महाराज : प्रधांजी, आम्ही क्रोधमग्न आहोत. आपण आमचेच प्रधांजी आहात ना? छोट्या छोट्या गोष्टींतून आपल्याला कसे शिकायला हवे हे आम्ही सांगावे? (मोबाईल मधून वाचत) मच्छराकडून काय शिकाल? सतत आनंदात गुणगुणत रहा.. माश्यांकडून काय शिकाल? कचऱ्याचाही द्वेष नको. त्याला ही सन्मान द्या. कोळयाकडून काय शिकाल? जागा मिळेल

तिथे जाळे विणा. उंदरांकडून काय शिकाल? चपळपणा नि कोठेही लपण्याची हातोटी. पालीपासून काय शिकाल? कोठेही चिटकून पुढे जात रहा. थोडक्यात जग म्हणजे एक बिनभिंतींची शाळा आहे. शिकाल तितके थोडेच आहे. शुभ मध्यरात्री. समजले प्रधांजी?

प्रधानजी : जी महाराज.

महाराज : तेव्हा केळी उत्पादक संघाकडून असे संदेश कसे बनवावेत वा बनू शकतात ते आपण शिकले पाहिजे. तसा आदर्श संदेश बनवण्यासाठी उच्च दर्जाची कल्पनाशक्ती लागते. ती असल्यानेच आपल्या लेखनिकांस आपण तनखा देत आहोत. तेव्हा त्यांस कामास लावणे.

प्रधानजी : आज्ञा महाराज. आपण म्हणता तशा सूचना लेखनिकास देऊ आम्ही.

महाराज : अजून थोडे बाकी आहे प्रधांजी. एकूण दिवसभरात संदेशांचा मारा चारीबाजूने व वेगाने होणे गरजेचे आहे. ही एक अहिंसक लढाई आहे हे समजून हल्ला चढवा. विचारास उसंत न देता हा मारा होऊ द्या. त्यात ऐंशी प्रतिशत तिघांच्या कुकर्मावरील, आकडेवारीसकट संदेश असू द्यात. बाकी वीस विनोद, गाणी वगैरे पद्धतीने असू द्यात, काहींमध्ये त्यांना बावळट दाखवा, काहीमध्ये कपटी तर काहींमध्ये

खलनायक. मग गावाकडल्या त्यांच्या मालमत्तांचा साद्यंत तपशील द्या. वर्षानुवर्षे चुकवलेल्या करांची आकडेवारी येऊ द्या. आणि महत्त्वाचे म्हणजे यापुढे याच जनतेस लुबाडण्याचे कारस्थान ते आखीत आहेत हे जनतेच्या मनावर बिंबवा. सतत मारा झाल्यास काही दिवसांतच जनतेस ही बाब पटेल. प्रथम काही दिवस त्या बाबतीत विचार होईल. काहींना पटेल, काहींना नाही. पुढे ज्यांना पटेल अशांची संख्या वाढत जाईल. ते हे संदेश तावातावाने पुढे धाडतील. काही काळात हे पटलेल्यांचे बहुमत होईल. न पटलेल्यांचा आवाज तेच परस्पर बंद करतील. आपल्याला मध्ये पडण्याचीही गरज नाही. पुढे न पटलेल्यांनाही हळूहळू प्रश्न पडू लागेल..धूर आहे तर आग असणारच. त्यांचा विरोध दुबळा होत जाईल. पुढे हीच बाब सत्य बाकी सारे असत्य हेच पटेल सर्वांना..

प्रधानजी : महाराज एकच सांगतो आम्ही.. ल.भा. ग्रेट. आपण इतके मुळापासून चिंतन केले आहे.. त्यात चूक होण्याची शक्यताच नाही.

महाराज : प्रधांजी, फक्त आपल्या वैज्ञानिकांस सांगा, या संदेशांचे मूळ शोधण्याची गरज नाही. गरज असल्यास आम्ही इशारा करू तेव्हाच कामास लागणे.

प्रधानजी : हु. हु.

महाराज : तेव्हा प्रधांजी, तत्काळ आणि युद्धपातळीवर कामाला लागा. लक्षात ठेवा ही एक लढाईच आहे. यात शत्रू दिसत नाही समोर. पण त्यास गारद करणे आहे ते युक्तीहुशारीने. आता रात्रभर चिंतनाने आम्ही दमलो आहोत. साधू अगदी वेळेवर आले. त्यांच्याशी तत्वचिंतनात हा मार्ग दिसला. साधुजनांच्या संगतीत असा ज्ञानाचा प्रकाश दिसतो. आम्ही त्यामुळे अत्यंत समाधानी आहोत आता. आमच्या ह्या युद्धात विजय आमचाच होणार. आम्हाला आताच दिसतेय पुढे काय होणार ते. पण आता आम्ही श्रमपरिहार करू. आणि यापुढे काय काय करावे याचे चिंतन करू. तेव्हा आम्ही आता हा दरबार बरखास्त करतो.,

प्रधानजी : आज्ञा हुजूर.

दरबारी : महाराजांचा विजय असो.

९

महाराज दरबारात येत आहेत..

सर्व दरबारी :

नमन नटवरा विस्मयकारा

तूच देशीचा तारणहारा

तुझ्या स्तुतीत आम्ही दंग

तुझ्या मुळेच तर चढतो रंग

देशभक्तीचा एकच नारा

नमन नटवरा विस्मयकारा

*महाराज येतात. हातात मोबाईल परत आलाय. त्याच्याकडे पाहात हसतात. मग गालिच्यावर अडथळता अडथळता चटकन उडी मारतात. सिंहासनावर टुणकन् उडी मारून बसतात. हातातल्या मोबाईलवर गुलाबाचे चित्र पाहात..*

महाराज : गुड मॉर्निंग. मॉर्निंग खरीच गुड आहे ना? आम्ही उत्सुक आणि आतुर आहोत आमच्या आदेशाचे परिणाम पाहण्यासाठी. आम्ही दिलेला आदेश नीट जर पाळला गेला असेल तर आमची खात्री आहे, हळूहळू जनमताची विझेल आग.. नव्हे, विझणार नाही, तर तिची धग जाणवेल त्या तिघांस. त्यात होरपळून निघतील ते तीन देशद्रोही. त्या वणव्यात त्यांच्यासारखा विचार करणारे भावी कुणी असतील तर तेही उखडून आणि मुळापासून खुडून काढले जातील. आणि मग आम्ही निर्वेध राज्य चालवू. कारण राज्यास आमची गरज आहे. राज्याच्या प्रगतीत असले अडथळे आणणारे, द्रोही तण आमच्या या नवीनतम तणनाशकाने नष्ट होईल.. आणि देशभक्तांचे पीक येईल भरघोस. त्या पिकांच्या दाण्या दाण्यावर आमचेच असेल नाव. असे भरघोस राष्ट्रोन्नतीचे पीक घेऊ आम्ही. त्यावर आमचेच नाव.. गावोगावी आमचेच नाव आणि जयजयकार. आम्ही आता त्याची परत बघतोय वाट. मध्ये सगळे मनासारखे होत असताना यांची दृष्ट लागली. पण आता पाहू आम्ही ह्या मोबाईलच्या जोरावर कसे होतात विरोधी सपाट.. आणि आम्ही होऊ सैराट.. अगदी निश्चिंत बिन बोभाट.. आम्ही त्या दिवसाची वाट पाहातोय, जेव्हा

सारे काही होईल आम्हास हवे तसे, गुळगुळीत आणि सपाट. नकोत असे चढ नि उतार, जे ओलांडण्यातच जातेय आमची वाया शक्ती आणि युक्ती. मग राष्ट्रोद्धार कधी करणार आम्ही? जनमानसात कधी रूजेल हे बीज.. आमच्या धोरणांस विरोध म्हणजे राष्ट्र उभारणीस विरोध. तो मग घालतो विकासाला खीळ. पण आम्ही नाही सोडणार आमचा पीळ. पण आमची ताकद तो विरोध मोडून काढण्यात गेली तर बाकी काम कसे करावे आम्ही? आणि आम्ही शेवटी विजयीच होऊ कारण जिथे ताकद तिथे जीत. आणि जिथे आम्ही तिथेच ताकद. प्रधांजी, बोलावे, काय हालहवाल?

प्रधानजी : महाराज, आपला अंदाज अगदी खरा ठरत आहे. गेल्या काही दिवसांत जनतेच्या वर्तणुकीत कमालीचे बदल झाल्याचे वृत्त आहे गुप्तचरांचे. जनतेत त्या तिघांप्रती अविश्वास निर्माण झाला प्रथम, लोक प्रथमच त्यांना प्रश्न विचारू लागले.. पुढे त्यांचा उद्दिष्टांबद्दल संशय निर्माण झाला. जनतेस त्यांच्या वागण्यात काळेबेरे दिसू लागले.. त्यांच्यामुळे सामान्य जनतेला होणाऱ्या त्रासाबद्दल जनजागृती होऊ लागली आहे. ज्या मोबाईलमधून त्या तिघांनी जनतेस भडकवले, त्याच मोबाईल मध्ये जनतेचा उद्रेक त्यांच्याच विरोधात होऊ लागला आहे. कित्येक जण

जमून त्यांच्या निषेधाच्या घोषणा देत आहेत. त्या तिघांच्या घरांवर मोर्चे निघताहेत. हाय हाय च्या घोषणा होताहेत. ते तिघे आपला बचाव करू पाहताहेत. पण एकदा संशयाचे, विशेषतः उद्दिष्टांबद्दलच्या संशयाचे बीज लोकांच्या मनात पेरले गेले की त्याचा वटवृक्ष होण्यास वेळ लागत नाही याचा प्रत्यय येतोय महाराज. आता या पुढे फक्त त्यांच्याबद्दल जनमत असे गढूळच राहिल. आपली लेखनिकांची कमाल अशी की अत्यंत नावीन्यपूर्ण असे संदेश धाडले जात आहेत. ते देशाच्या कानाकोपऱ्यात धडाधड पोहोचत आहेत. आपल्या आदेशानुसार सुरू आहे सारे. दिवसभरात असंख्य वेळा त्या तिघांच्या बदनामीचा मजकूर लोकांच्या हाती पडत आहे. जनमत आता त्यांच्या कितीही प्रयत्नांनंतरही त्यांच्या बाजूस वळण्याची शक्यता नाही महाराज. आपल्या द्रष्टेपणाचे आम्हाला अत्यंत कौतुक वाटते. एकूण साप पण मरेल नि काठी पण तुटणार नाही असे दिसते आहे महाराज.

महाराज : आम्हास याची खात्रीच होती. हे असे होणार याची खात्री असल्यानेच आम्ही त्या तिघांस कैदेत न टाकण्याचे आदेश दिले होते. आता काहीच दिवसांत ही मोहीम थंड होईल. त्यानंतर त्या तिघांबद्दल पुढे आदेश देऊ आम्ही.

प्रधानजी : हु. हु.

महाराज : प्रधांजी, हे एक शीतयुद्धच आहे. शीत डोक्याने करावयाचे. आणि कित्येकदा बाहेरील शत्रूपेक्षा आतील विरोधी लोकच जास्त नुकसान करून जातात. बाह्य शत्रूबद्दल जनमत आधीच तयार असते. ह्या अंतर्गत शत्रूंबद्दल मात्र आम्हास जास्त खबरदारी घ्यावी लागते. आणि आमच्या ध्येयधोरणास विरोध म्हणजे राष्ट्रोन्नतीस विरोध. आणि असा विरोध करणारे ते आमचे आणि देशाचे शत्रूच. मग भले ते आमचेच नागरिक का असेनात. त्यांचा बंदोबस्त हा देश रक्षणाइतकाच महत्त्वाचा हे जाणले आहे आम्ही. आम्ही आता या पुढील विचार करीत आहोत..

*शिपाई धावत आत येतो. प्रधानजींशी बोलतो. प्रधानजींच्या चेहऱ्यावर आधी सुटकेचे मग चिंतेचे भाव आहेत..*

महाराज : काय घडामोड प्रधांजी?

प्रधानजी : महाराज, खबर अशी आहे, की जनता आता चिडून, पेटून उठली आहे. जे मोर्चे आधी नवीन कराबद्दल होते ते आता त्या तिघांच्या घरांवर निघत आहेत. पण जनता आता इतकी

खवळली आहे की त्या तिघांपैकी एकाच्या हत्येचा प्रयत्न जनतेने केल्याची बातमी आहे. म्हणून शिपाई घाईघाईने आला सांगत. आपल्या सुरक्षा व्यवस्थेने त्याला वाचवले, पण असेच त्या इतर दोघांच्यावरही हल्ले होण्याची शक्यता आहे असा अहवाल आहे. आम्हाला वाटते महाराज, त्यांचे लोकांच्या हाती जे व्हायचे ते होऊ द्यावे..

महाराज : प्रधांजी, चुकताय तुम्ही इथे. असे होऊ दिले तर त्यास कायद्याचे राज्य म्हणता येईल का? ते तिघे आता आपले शत्रू नाहीत. जनता त्यांच्या मागे नसेल तर त्यांचा आता उपयोग आम्ही सांगतो तसा करा..

प्रधानजी : हु. हु.

महाराज : तातडीने त्या तिघांच्या सुरक्षेत वाढ करा. काहीही होवो, त्यांच्या जिवास धोका होता कामा नये. तशा सक्त सूचना द्या. जनतेस संयम बाळगण्याचे आवाहन करा. कायद्याच्या चौकटीत त्या तिघांवर कारवाई होईल हे समजावून सांगा. जनतेस पटवून द्या की आम्ही राष्ट्रद्रोही असलेल्या कुणाचीही गय करणार नाही. पण आम्हाला निव्वळ विरोध केला म्हणून त्या तिघांस अशी शिक्षा जनता करू शकत नाही. आम्ही कायद्यानुसार त्यांस शिक्षा करूच पण तोवर राज्याचे एक नागरिक म्हणून त्यांचे  रक्षण करणे एक राजा

म्हणून आमचीच जबाबदारी असेल. त्यामुळे जनतेचे क्रोधमग्न होणे आम्हाला समजू शकते तरीही आम्हाला विरोध करणाऱ्यांशीही आम्ही न्यायानेच वागू. आमच्या विरोधकांशीही किती न्यायाने वागतो आम्ही ह्याबद्दल लेखनिकांकडून संदेश लिहून घ्या आणि पसरवा. त्याचबरोबर जनतेस संयमाचे आवाहन करा..

प्रधानजी : हु. हु.

महाराज : या उप्पर आम्ही अधिक सांगावे असे काही नाही. फक्त न्याय प्रक्रिया जलदगतीने होईल असे पहा. पुढील थोड्याच दिवसांत ते तिघे आपल्या कैदखान्यात परत आले असतील हे पहा. आपल्या न्याय व्यवस्थेच्या ह्या गोष्टी आजूबाजूच्या परदेशी पण पाठवण्याची व्यवस्था करा. साधूंची शिकवण आहे, परिस्थितीतून बाहेर पडायचे तर संकटांशी मुकाबला तर सारेच करतात, संकटांत संधी शोधणारे थोडे.. आणि संकटांतून नव्या संधी निर्माण करणारे मुत्सद्दी तर त्याहूनही थोडे. आम्ही संकटास तोंड तर दिलेच, त्यातून त्या तिघांस जनरोषास बळी पाडले आता त्यातून आमच्या न्यायदानाची महती आम्ही देशोदेशी पसरवू. आम्हास खात्री आहे, साधूंना आमचा अभिमानच वाटेल. त्यांनी दाखवलेल्या वाटेवर आम्ही चालत आहोत नि चालत राहू.

प्रधानजी : तुस्सी ग्रेट हो महाराज.. ल. भा. एकदम

महाराज : धन्यवाद प्रधांजी. पण आम्ही या विषयावर मूलभूत आणि मूलगामी चिंतन केले आहे. या संकटातून आम्ही बाहेर पडतच आहोत.. पण संकटे सांगून येत नाहीत म्हणतात.. आम्हास हे बदलावयाचे आहे. तत्काळ याबद्दल आम्ही काही आदेश देत आहोत..

प्रधानजी : हु. हु.

महाराज : आमचे राज्य हे प्रगत आणि आधुनिक विचारांचे राज्य आहे व राहील. आधुनिक विचारांचा आमच्यावरील प्रभाव सर्वांसच ठाऊक आहे. विज्ञान व तंत्रज्ञान ही आजची प्रभावी अस्त्रे आहेत. विविध जनसामान्यांच्या समस्या सोडवण्यासाठी विज्ञानाधिष्ठित राज्य हे आमचे स्वप्न आहे. तंत्रज्ञानाधारित समाज व डिजिटल समाज ही आमची स्वप्ने आहेत. असे प्रगत व विकसित राज्य व त्या राज्याचे आम्ही सत्ताधीश हे स्वप्न आहे आमचे. अशा राज्यात प्रगतीस खीळ बसू नये असे आम्हास वाटल्यास त्यात गैर काहीच नाही. आमच्या धोरणाविरोधी विचार आम्हास प्रगतीपथावरून कित्येक मैल मागे नेऊन सोडतो. आमचा कालपव्यय होतो. शक्ती व्यय होतो. तेव्हा विज्ञानाच्या मदतीने हे टाळणे जरूरी आहे. आमचा आदेश वैज्ञानिकांस

द्या. लवकरात लवकर असे तंत्रज्ञान शोधून काढा ज्यातून जनतेच्या मनात येणारे विचार आम्हास बसल्या बसल्या समजू शकतील. म्हणजे विरोधी विचार उत्पन्न होता होता त्याचा सुगावा लागला तर त्याचे उच्चाटन तो मूळ धरून वाढण्याआधीच करता येईल. शेवटी विज्ञानाची कास धरण्यातच समाज व राष्ट्र हित आहे. आमचा हुकूम वैज्ञानिकांस द्या. आणि तातडीने अंमलबजावणी करा. पुढील कुठल्या संकटाच्या आत आम्हास याचे उत्तर हवे आहे. शेवटी आमच्या मदतीस येईल ते विज्ञानच.. धाडून द्या त्यांस हुकूम आणि आदेश.

प्रधानजी : हु. हु. आम्ही धाडतो तसे आदेश. वैज्ञानिकांनी हे तंत्र शोधल्यास महाराज आपले काम कित्येक पटीने सुकर होईल.

महाराज : शोधल्यास? त्यांस शोधावेच लागेल ते. राज्यहितासाठी. आम्हास फिकिर आमची नाही. आम्हास राज्याची चिंता आहे. आम्ही जे काही करतो तो राज्याच्याच भल्यासाठी. त्याविरोधात कुणी शब्द काढणे म्हणजे आमचा म्हणजे राज्याचा उपमर्द. असला द्रोह समूळ नाहीसा व्हावा हे आमचे प्रगतीशील राजा म्हणून स्वप्न आहे. आमची आज्ञा आहे, विज्ञान व वैज्ञानिक.. आम्हास यांनी साथ द्यावी.

त्यानंतर आम्हास या विषवल्लीच्या मुळावरच घाव घालता येईल. आदेश पाठवा त्यांना..

प्रधानजी : अर्थातच महाराज, आपल्या हुकुमानुसारच होईल सारे.

महाराज : आमच्यावरचे म्हणजे राज्यावरचे एक मोठे संकट टळले. आता आम्ही सुखाने विश्राम करू शकतो. सुखाने श्वास घेऊ शकतो. आम्ही मानसिक थकव्याने शिणलो आहोत.

प्रधानजी : आपणास श्रमपरिहाराची गरज आहे महाराज. आपण विश्राम करावा. झालेच तर व्हॉट्स्यापी विनोद वाचावेत.. आपला हुकूम असेल तर लेखनिकांस ताजे विनोद संदेश धाडण्याचा आदेश देतो आम्ही. उद्यापासून आपला नेहमीचा दरबार सुरू होईल. नेहमीचे कामकाज सुरू होईल. तोवर आपण विश्रांती घ्यावी. या लाखांच्या पोशिंद्यास ताजेतवाने परत मैदानात उतरावेच लागेल रयतेच्या भल्यासाठी. त्यासाठी श्रमपरिहार हवाच.

महाराज : म्हणजे दरबार बरखास्त करावा आम्ही?

प्रधानजी : अर्थात महाराज. बाकी कारभार आम्ही सांभाळून घेऊ.

महाराज : एक मोठे ओझे उतरले डोक्यावरचे. आज आम्ही शांत निद्रा घेऊ शकू. आणि तुम्ही म्हणता तसे नव्याने नवा दरबार भरेल उद्यापासून. तोवर दरबार बरखास्त..

प्रधानजी : आज्ञा हुजूर.


दरबारी : महाराजांचा विजय असो.


(पडदा पडतो)


------ समाप्त ---

डॉ. नितीन मोरे यांची प्रकाशित पुस्तके

यांच्या कव्हरवर क्लिक करताच (नेट असल्यास) पुस्तक उघडेल.
























डॉ. नितीन मोरे
न.वा.च्या(प्रेम)कविता








डॉ. नितीन मोरे
वाळूतील
रेघा

राग दरबारी
डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे
अहम्
ब्रह्मास्मि

डॉ. नितीन मोरे
नाच जमूरे नाच

डॉ. नितीन मोरे
आधुनिक कहाण्या

डॉ. नितीन मोरे
प्रिय पत्रास,

डॉ. नितीन मोरे
भ्र
शिष्टाचार

डॉ. नितीन मोरे
संधी साधू

डॉ. नितीन मोरे
या
कोल्हटकरांच्या
घरात

डॉ. नितीन मोरे
मच्छर टाईम्स

डॉ. नितीन मोरे
एकपात्री नाट्यछटा
सांगतो
ऐका

डॉ. नितीन मोरे
केल्याने

डॉ. नितीन मोरे
संवादोनी
प्रकटावे

डॉ. नितीन मोरे
अ..अ..म..
अवलोकन.अनुभव.मनोव्यापार

डॉ. नितीन मोरे
काही(च्या काही)कविता

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे तेरावे वर्ष.

## डॉ. नितीन मोरे यांच्या पुस्तकांचे पावशतक पूर्ण.

डॉ. नितीन मोरे एक यशस्वी डॉक्टर आहेतच आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक ताजेपण आणि खुसखुशीत विनोद असतो. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, तर समाजातील अनिष्ट विसंगती ते आपल्या विनोदातून अलगद दाखवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली डॉ. नितीन मोरे आपली अनेक पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंडित.

शंभू गणपुले (नऊ पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९ पुस्तके), डॉ. वसंत बागुल (१६ पुस्तके), शुभांगी पासेबंद (९ पुस्तके), अविनाश नगरकर (चार पुस्तके), नासा येवतीकर(८), डॉ. स्मिता दामले (९ पुस्तके), डॉ. नितीन मोरे (२५ पुस्तके), अनील वाकणकर (७ पुस्तके), रत्नाकर महाजन (४ पुस्तके), अनंत पावसकर(चार

पुस्तके), मधू शिरगांवकर (४), अशोक कोठारे (१० हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (महाराष्ट्राचे मुख्य अभियंता, ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक, ४ पुस्तके), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (८ पुस्तके), उल्हास हरी जोशी(६), नंदिनी देशमुख (५), सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१३), डॉ. नंदिनी धारगळकर(८) संयम बागायतकर(२), मीना खोंड(३) असे अनेक ज्येष्ठ, अनुभवी लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत पोहोचवतात. एकही पैशाची अपेक्षा न ठेवता.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपले नाव नेऊन ठेवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

www.esahity.com
esahity@gmail.com